नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २५७ * * अकोला * गुरुवार, दिनांक १३ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




अग्रलेख

## खरीखरी..

## पेरले ते उगवले

पाकिस्तानात बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने 500 प्रवाशांना घेऊन जाणारी रेल्वेगाडी एका बोगद्यात स्फोट करून अडवली आणि ताब्यात घेतली. महिला आणि मुले यांना सोडल्यावर जवळजवळ 400 प्रवासी त्यात अडकलेले आहेत. म्हणजेच ते ओलीस आहेत. पाकिस्तानला हा अनुभव घेणे गरजेचे होते. भारताविरुद्ध पाकड्यांनी अनेक वेळा हा प्रयोग केलेला होता. त्यांनी एक अख्खेच्या अख्खे विमान काही वर्षापूर्वी पळवून नेले आणि काश्मीरच्या अतिरेक्यांची सुटका करून घेतली होती. त्यानंतरच त्यांनी ओलीस असलेल्या प्रवाशांना सोडलेले होते. असे अनेक कारनामे पाकिस्तानने केलेले आहेत. आता ही बलुचिस्तान लिबरेशन आर्मी काय आहे. तर या संघटनेला आंतरराष्ट्रीय समुदायाने दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलेले आहे, हे महत्त्वाचे आहे. 1970 साली या दहशतवादी संघटनेची स्थापना झाली होती. ही संघटना बलुचिस्तानला स्वतंत्र करण्यासाठी कटिबद्ध आहे. पाकिस्तानात बलुचिस्तान हा खनिज श्रीमंत प्रदेश आहे. या भागाचे सर्व फायदे पाकिस्तानी लष्कराला व चीनला मिळतात. असा या बंडखोरांचा दावा आहे. पाकिस्तानची आर्मी भारतात काय काय धुमाकूळ घालते. हे सर्वांना ठाऊक आहे. बलुचिस्तान खनिज संपत्तीने श्रीमंत असल्यामुळे तेथील नागरिकांना या समृद्धीचा लाभ मिळाला पाहिजे. अशी या भागातील बहुसंख्य नागरिकांची मागणी आहे. पाकिस्तानी लष्कर या सोन्याच्या कोंबडीला आपल्या हातून जाऊ देणार नाही. परंतु परिस्थिती अशी आहे की, बलुचिस्तान मध्ये ठिकठिकाणी पाकिस्तानी सेनेने अत्याचार केलेले आहेत. चीन-पाकिस्तान इकॉनोमिक कॉरिडोरला बलुचिस्तानच्या जनतेचे शोषण करणारा प्रकल्प म्हणून बलुचिस्तानने घोषित केले आहे. पाकिस्तानचे लष्कर या लोकांना भडकवण्याचा आरोप आपल्या भारत देशावर करत आहे. मात्र, भारताने अशा प्रकारच्या कारवाया कधीच केलेल्या नाहीत. त्यामुळे बलुचिस्तानी आणि पाकिस्तान यांच्यातील हा अंतर्गत संघर्ष आहे. असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. पाकड्यांनी भारतात काय काय केले नाही. त्यांनी मुंबईत बॉम्बस्फोट मालिका घडवली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर निरपराधांच्या हत्या झाल्या आहेत?. एवढे असूनही भारताच्या डीएनए मध्ये अशा प्रकारची विघातक कृत्य करण्याची संधीच नसते. त्यामुळे पाकिस्तानने कितीही कांगावा केला तरी जगावर त्याचा परिणाम होत नाही. एका ग्लोबल एजन्सीने दिलेल्या अहवालानुसार पाकिस्तानला जगातील सर्वाधिक दहशतवादी देशांमध्ये दुसरा क्रमांक देण्यात आलेला आहे. आता पाकिस्तानामध्ये गुरुची विद्या गुरुवरच उलटवण्याचे काम बलुचिस्तानातील त्यांची लिबरेशन आर्मी ही संघटना करीत आहे. पाकड्यांनी या लोकांना इतक्या यातना दिलेल्या आहेत की, आता त्यांच्या संयम आणि धैयार्चा घडा फुटलेला आहे. फाळणी झाली त्यावेळी बलुचिस्तानचे नेते खान अब्दुल गफारखान यांनी भारताने आम्हाला हिंस्त्र श्वापदांसमोर फेकले आहे, असे उद्गार काढले होते. खान अब्दुल गफारखान यांना सरहद गांधी असे म्हणत असत. बलुचिस्तान भारतात असावे, असे त्यांचे म्हणणे होते. पाकिस्तान दोन भागात विभाजित होऊ शकते. तर भारताला तसे करता येणे का शक्य नाही, असा त्यांचा सवाल होता. त्यामुळेच की काय बलुचिस्तानला नेहमीच दाबून टाकण्याचे काम पाकिस्तानच्या सदा गुन्हेगार लष्कराने केलेले आहे आणि आजही ते करत आहेत. पाकिस्तान मध्ये लष्कराची सत्ता असताना या भागावर अन्यायाची परंपराच लादली गेलेली आहे. पाकिस्तानचे राज्यकर्ते कोणीही असो. मग ते आयुब खान असो, याह्या खान असो किंवा झिया-उल-हक असो. आजच्या घडीला सुद्धा सरकार कोणाचेही असले तरी पाकिस्तानचे सैन्य आपली हुकूमशाही चालवायला कमी करत नाही. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इमरान खान यांनी पाकिस्तानच्या लष्कराशी पंगा घेतल्याबरोबर त्यांच्यावर इतके आरोप लावलेले आहेत की, इमरान खान यांना जेलच्या बाहेर येणे अशक्य झालेले आहे. आता अपहरणाची घटना घडल्यावर पाकिस्तानच्या सैन्याने गोळीबार केला आणि बॉम्ब वर्षावही केला. पण त्यामुळे त्यांच्या हाती काहीच लागलेले नाही. पाकिस्तानचे एक मंत्री मोहसीन नक्वी असे म्हणतात की, निरपराध प्रवाशांवर गोळीबार करणाऱ्यां सोबत आम्ही मुळीच चर्चा करणार नाही. आम्ही अतिरेक्यांना ठार करू, अशा लंब्याचवड्या फुसक्या पाकिस्तानच्या या मंत्र्याने सोडलेल्या आहेत. बलुचिस्तानच्या लिबरेशन आमीर्ने आता त्यांचे नाक दाबलेले आहे. यापुढेही पाकी लष्कराच्या नाकातला शेंबूड ही संघटना काढू शकते. याचे कारण असे आहे की, बलुचिस्तानात आता पाकड्यांना मुळीच प्रवेश मिळत नाही. आजपर्यंत पाकिस्तानने अमेरिकेच्या पैशांवर भारताशी पंगा घेतला होता. अजूनही त्यांची हौस जिरलेली नाही. पाकचे राज्यकर्ते भारता बरोबर मैत्रीचे संबंध स्थापित करण्यासाठी पाऊल उचलतात आणि तिकडे लष्कर दहशतवादाला खतपाणी घालते. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी भारताबरोबर संबंध सुधारण्याचा प्रयत्न केल्याबरोबर त्यांचाही इमरान करण्याचा पाकिस्तानी लष्कराचा इरादा होता. पण नवाज शरीफ यांना आपले लष्कर किती शरीफ आहे. हे ठाऊक असल्यामुळे त्यांनी तब्येतीच्या नावाखाली परदेशात वास्तव्य केले आणि आता लष्कराच्या वॉशिंग मशीन मधून त्यांची साफसफाई झालेली आहे. अशा या दहशतवादी मानसिकतेच्या पाकिस्तानी लष्कराला बलुचिस्तानच्या लिबरेशन आर्मीने दिलेला झटका काही सर्वसाधारण नाही. आता या संघटनेने जवळजवळ युद्धच पुकारलेले आहे. आता कोण कोणाला शरण जातो. हे लवकरच ठरणार आहे. एक गोष्ट मात्र नक्की आहे की, स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तानने पद्धतशीर खतपाणी घालून जो दहशतवाद पेरला आहे. त्याची फळे आता पाकिस्तानी लष्कराला आणि पाकिस्तानी जनतेला भोगावी लागत आहेत. आपल्या मराठीत एक म्हण आहे. ती म्हणजे करावे तसे भरावे, त्याची प्रचिती आता पाकिस्तानच्या लष्कराला येत आहे. पण हे कुत्र्याचे शेपूट सरळ होऊन 'पाक' होईल काय?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# प्रधानमंत्री मोदींना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

■ वृत्तसंस्था
पोर्ट लुईस, दि. १२ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी मॉरिशसच्या ५७ व्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात सहभागी होण्यासाठी गेले आहेत. पंतप्रधान मोदींना मॉरिशसचा सर्वोच्च सन्मान 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' देण्यात आला.

हा सन्मान मिळवणारे मोदी हे पहिले भारतीय आहेत. कोणत्याही देशाने पंतप्रधान मोदींना दिलेला हा २१ वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे. पंतप्रधान मोदी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



*मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी मोदी यांना सन्मानित केले. पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रपती धरम यांना गंगाजल आणि त्यांच्या पत्नीला बनारसी साडी भेट दिली.*

१२ मार्च १९६८ रोजी मॉरिशसला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाले. १९९२ मध्ये ते कॉमनवेल्थ अंतर्गत प्रजासत्ताक बनले. भारतीय वंशाचे सर सीवूसागुर रामगुलाम यांच्या नेतृत्वाखाली मॉरिशसला स्वातंत्र्य मिळाले. मॉरिशस हा दिवस राष्ट्रीय दिन म्हणून साजरा करतो. समारंभात पंतप्रधान मोदी यांना तोफांची सलामी देण्यात आली.

### ८ करारांवर सहमती

सकाळी भारत आणि मॉरिशसच्या पंतप्रधानांमध्ये द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही देशांमध्ये ८ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. पंतप्रधान मोदी आणि मॉरिशसच्या पंतप्रधानांनी संयुक्त पत्रकार परिषदही घेतली. मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या स्वातंत्र्याच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय दिन समारंभात उपस्थिती लावून आपला सन्मान केला आहे. त्यांची उपस्थिती दोन्ही देशांमधील चांगल्या संबंधांचा पुरावा आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, मी मॉरिशसच्या लोकांचे त्यांच्या राष्ट्रीय दिनानिमित्त अभिनंदन करतो. भारत-मॉरिशस भागीदारीला 'वर्धित धोरणात्मक भागीदारी'चा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भारत मॉरिशसला नवीन संसद भवन बांधण्यासाठी मदत करेल. मोदींनी याला 'लोकशाहीची जननी' असलेल्या भारताकडून मॉरिशसला मिळालेली भेट म्हटले. या देशाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

## शक्तिपीठ करायचा, पण लादायचा नाही..

### मुख्यमंत्री फडणवीस यांची स्पष्टोक्ती



■ महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. १२ :

राज्य सरकारला शक्तिपीठ महामार्ग करायचा आहे, पण तो लादायचा नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत स्पष्ट केली.

सरकार या प्रकरणी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन पुढले पाऊल उचलेल, असे ते म्हणालेत. त्यामुळे या महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध असला तरी सरकार कोणत्याही स्थितीत हा आपला ड्रीम प्रोजेक्ट पूर्ण करणार हे स्पष्ट झाले आहे.

शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्या १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे आंदोलन मुंबईतील आझाद मैदानावर सुरू आहे. त्यांनी हा महामार्ग रद्दबातल करण्याची मागणी केली आहे. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. तसेच विधान परिषदेत स्थगन प्रस्ताव सादर करत त्यावर सरकारची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. त्यानंतर झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामार्गावरील सरकारची भूमिका स्पष्ट केली.

मुख्यमंत्री म्हणाले, या प्रकरणी सरकारची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. काँग्रेस नेते बंटी पाटील यांच्यासोबत कोल्हापूर विमानतळावर शेतकरी प्रतीक्षा करत होते. ते या मार्गाला विरोध करत नव्हते. त्यांनी त्यांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन आम्हाला दिले आहे. त्याती एकही सही खोटी असेल तर त्यावर कारवाई केली जाईल.

प्रस्तावित महामार्गामुळे मराठवाड्यातील ५ जिल्ह्यांचे चित्र बदलणार आहे. शेतकऱ्यांना हा महामार्ग हवा आहे. समृद्धी महामार्गामुळे १२ जिल्ह्यांतील जीवनमान बदलले. त्यानुसार या महामार्गामळेही अनेकांचे जीवन बदलणार असल्याचे फडणवीस यावेळी म्हणाले.

## वैध पासपोर्टशिवाय भारतात प्रवेशावर ५ वर्षे तुरुंगवास

### इमिग्रेशन विधेयक लोकसभेत सादर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :
भारतात येणाऱ्या परदेशी नागरिकांच्या स्थलांतर प्रक्रियेला सुलभ करण्यासाठी, केंद्र सरकारने लोकसभेत इमिग्रेशन अँड फॉरिनर्स बिल-२०२५ सादर केले.

या विधेयकानुसार, जर कोणी परदेशी व्यक्तीला बेकायदेशीरपणे देशात आणले, सामावून घेतले किंवा स्थायिक केले तर त्याला ३ वर्षांचा तुरुंगवास किंवा २ ते ५ लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. कोणत्याही परदेशी व्यक्तीला भारतात प्रवेश करण्यासाठी 'वैध पासपोर्ट आणि व्हिसा' असणे अनिवार्य असेल.

## महाराष्ट्राचा तालीबान करण्याचा भाजपाचा कुटील डाव : सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. १२ :
छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात सर्व जाती-धर्मांचे लोक होते, मात्र भाजप खोटी माहिती पसरवून महाराष्ट्रातील सामाजिक सौहार्द बिघडवत आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

मंत्री नितेश राणे यांनी सातत्याने धार्मिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करून समाजात विष कालवण्याचे काम केले असल्याचा आरोप करत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जर त्यांना पाठिंबा दिला नसेल, तर त्यांची तात्काळ मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणीही सपकाळ यांनी केली.

## बीएसएफ जवानांचे वाहन दरीत कोसळले

### तिघांचा मृत्यू १३ जखमी

■ वृत्तसंस्था
इंफाळ, दि. १२ :

मणिपूरमधील सेनापती जिल्ह्यात बीएसएफ जवानांना घेऊन जाणारे एक वाहन दरीत कोसळले. या अपघातात तीन सैनिकांचा मृत्यू झाला, तर १३ जण गंभीर जखमी झाले. इम्फाळ-दिमापूर महामार्गावरील चांगौबुंग गावाजवळ सायंकाळी ४ वाजता हा अपघात झाला. सैनिकांना घेऊन जाणारे वाहन ओव्हरलोड होते. सर्व सैनिक एकाच बटालियनचे आहेत आणि झाडिमा येथे तैनात होते.






## १५०० रुपयांचा लाभ देणारे महायुतीचे एकमेव सरकार - तटकरे



■ **मुंबई** : आज विधानसभेत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात विरोधकांनी काही लाभार्थी महिलांना योजनेतून वगळण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला.

त्यावर लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णय जारी केला तेव्हाच त्यात नमूद करण्यात आले होते की 1500 हून अधिकचा आर्थिक लाभ इतर कोणत्या योजनेतून लाभार्थी महिलांना मिळत असेल, तर त्यांना लाडकी बहीण योजना लागू होणार नाही, असे मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, यावेळी आदिती तटकरेंनी या वेळी 2100 रुपये हप्ता होण्यासंदर्भात उत्तर दिले. महायुती सरकारने ही योजना आणली आहे. महिलांना 1500 रुपयांचा लाभ देणारे महायुतीचे एकमेव सरकार आहे. महिलांना हा लाभ कायम मिळत राहणार आहे. 2100 रुपये संदर्भात आमचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री मिळून निर्णय घेतील. पण लाडक्या बहिणींची फसवणूक होणार नाही, असे आदिती तटकरे म्हणाल्या.

लाडक्या बहिणींना 2100 रुपये कधीपासून मिळणार? या प्रश्नावरून आज सभागृहात गोंधळ झाला. विरोधकांनी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना लाडकी बहीण योजनेबाबत प्रश्न विचारले. विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देताना अदिती तटकरेंची कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. लाडक्या बहिणींना 2100 रुपये कधीपासून मिळणार? या प्रश्नासाठी त्यांनी अखेर फडणवीस, अजित पवार आणि शिंदे यांच्याकडे बोट दाखवून तूर्तास वेळ मारून नेली. अपेक्षित उत्तर न मिळाल्याने विरोधकांनी सभात्याग केला.

## बनावट पनीर घेऊन आमदार पाचपुतेंची निदर्शने



■ **मुंबई** : भारतीय जनता पक्षाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी बनावट पनीर घेऊन विधिमंडळ परिसरात निदर्शने केली. बनावट पनीर संदर्भात तपासण्यासाठी घरगुती असा कोणताही उपाय नसल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात माझा विधानसभेत तारांकित प्रश्न लागल्यानंतर घाई घाईने संबंधीत विभागाच्या वतीने राज्यात कारवाई करण्यात आली. मात्र विभागाकडे अधिकारीच नसल्याने छापेमारी होत नसल्याचा आरोप आमदार पाचपुते यांनी केला आहे.

## शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचा मोर्चा

■ **मुंबई** : नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामागार्ला विरोध करण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचा आझाद मैदानावर धडक मोर्चा काढण्यात आला आहे. या मोचार्ला काँग्रेस विधिमंडळ विधान सभानेते विजय वडेट्टीवार, विधान परिषद गटनेते सतेज पाटील, विश्वजीत कदम, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे राजू शेट्टी उपस्थित होते.

## हाणामारीवरून रोहित पवार यांची टीका

■ **मुंबई** : कायदा व सुव्यवस्थेला विवस्त्र केल्याचे महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. लातूर जिल्ह्यातील दोन्ही गटात झालेल्या हाणामारीवरून आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. कायदा आणि सुव्यवस्थेला महाराष्ट्रात गुंड लोक किंमत देत नसल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र नंतर लातूर पोलिसांनी ज्या पद्धतीने धिंड काढली ते स्वागत करण्यासारखे असल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे.

पुण्यात बीएमडब्ल्यू घेऊन ज्या पद्धतीने युवक चाळे करत होता त्याला देखील पुण्यात अशाच पद्धतीने फिरवायला हवे होते, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. राज्याच्या सर्व भागात वाढत चाललेली गुन्हेगारी आणि गृहखात्याचे दुर्लक्ष यावरून देखील त्यांनी सरकारवर टीका केली.

# सुरेश धस, पंकजा मुंडे वाद टोकाला



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२** : बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या हत्या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस महायुतीच्या नेत्यांवर आरोप करत आहे. यामुळे राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी पक्षश्रेष्ठींनी सुरेश धस यांना समज द्यावी, अशी मागणी केली आहे.

सुरेश धस सर्वत्र कॅमेरे घेऊन फिरतात मग धनंजय मुंडे यांची भेट गुपचूप का घेतली? असा सवाल करत सुरेश धस यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत पंकजा मुंडे यांनी हा सवाल केला.

आमदार सुरेश धस, पंकजा मुंडे दोन्ही भाजपत आहेत. परंतु त्यांच्यात राजकीय मतभेद आहेत. त्यामुळे एकमेकांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न ते करत असतात. सुरेश धस यांच्यासंदर्भात बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, राज्यात गेल्या तीन-चार वर्षांपासून महायुतीचे सरकार आहे. धनंजय मुंडे मागील महायुतीच्या सरकारमध्ये पालकमंत्री होते. त्यावेळी सुरेश धस आमदार होते. वाल्मिक कराड याचे काम सुरु होते. त्यावेळी धस यांनी त्यासंदर्भात कधी तक्रार का केली नाही? आताच त्यांना बीडमधील गुन्हेगारी कशी दिसू लागली? असा प्रश्न पंकजा मुंडे यांनी उपस्थित केला.

पंकजा मुंडे म्हणाल्या, मी भाजपमध्ये राष्ट्रीय नेता आहे. त्यानंतरही पक्षातील एक आमदार आपल्यावर आरोप करत आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना समज देणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा व्यक्त करत एकप्रकारे या प्रकरणात पक्षश्रेष्ठींना घेतलेल्या भूमिकेबद्दल पंकजा मुंडे यांनी नाराजी व्यक्त केली.

बीड जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे अंतर्गत मतभेद बुधावारी माध्यमांसमोर पुन्हा एकदा आले. भाजप आमदार सुरेश धस आणि भाजप मंत्री पंकजा मुंडे यांनी एकमेकांवर टीका करत पक्ष नेतृत्वाकडे तक्रार करण्याची भाषा केली. पंकजा मुंडे यांनी मी राष्ट्रीय नेत्या असताना माझ्यावर सुरेश धस आरोप करतात, यामुळे आपण त्यांची तक्रार करणार असल्याचे म्हटले. त्याला उत्तर देताना सुरेश धस यांनी पक्षाचा उमदेवार सोडून दुसऱ्याचा प्रचार राष्ट्रीय नेत्या पंकजा मुंडे यांनी केल्यामुळे त्यांची लेखी तक्रार करणार असल्याचे सांगितले.

आमदार सुरेश धस म्हणाले, संतोष देशमुख हे भाजपचा बुथ प्रमुख आहेत. त्यामुळे हे प्रकरण मी तापवले आहे. जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा होत नाही? तोपर्यंत हे प्रकरण तेवत ठेवणार आहे. पंकजाताई म्हणतात, मी आणि माझा पक्ष मग आम्ही कोणत्या पक्षाचे आहोत, आम्ही भाजपचे आहोत ना. विधानसभेत त्यांची एकच जागा होती, असे त्या जाहीरपणे म्हणत होत्या. पंकजा ताईंचे आष्टी मतदार संघात कमळ चिन्ह नव्हते, त्यांचे शिट्टी हे चिन्ह होते. आमच्याकडे पंकजा मुंडे यांच्या विचारांचा माणूस आष्टीमधून निवडून आला नाही,

मी भाजपचा व्यक्ती म्हणून निवडून आलो आहे. हे त्यांचे दुःख आहे. भाजप उमेदवार ऐवजी दुस?या उमेदवाराचा प्रचार केल्यामुळे मी पंकजा मुंडे यांची तक्रार राष्ट्रीय नेतृत्वाकडे लेखी स्वरुपात करणार आहे, असे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

मला समज देण्याचे कारण काय? मी पक्षाचा उमेदवार सोडून दुस?याचा प्रचार केला नाही. त्यांनी आष्टीत कमळाचा प्रचार सोडून शिटीचा प्रचार केला. त्या बीडमध्ये माझी एकच जागा आहे, असे म्हणत होत्या. ते व्हिडिओ तुमच्याकडे आहे, असे धस यांनी सांगितले.

## ओएसडींची जशी केली तशी साफसफाई इकडेही...



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२** : होळी आधीच ठाण्यात कचऱ्याच्या प्रश्नावरून शिमगा सुरू झाला आहे. ठाणे महापालिकेच्यावतीने गेले काही दिवस घनकचरा उचलला जात नाही आणि कचरा उचलण्याची कोणतीही पर्यायी व्यवस्था देखील नाही.

मागे युरोपवरून मशीन आणल्या आहेत. 1400 कोटी ठेका फडणवीस यांनी दिला होता. त्यानंतर त्याला पुन्हा तर ठेका देणार नाहीत ना असा माझा सवाल आहे. येत्या तीन दिवसात तोडगा निघाला नाही तर आम्ही पालिका मुख्यालयासमोर कचरा टाकणार आहोत असा अल्टीमेटम राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी ठाणे महापालिका आयुक्तांना दिला आहे.

मुंब्रा विभागात अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून वसुली सुरू आहे. या मागे कोण याचा शोध पालिका आयुक्तांनी केबिनमधून बाहेर पडून केला पाहीजे, त्यांचे अधिकारीच वसुलीला लागले आहेत असा सनसनाटी आरोप आनंद परांजपे यांनी केला आहे.

## शिवरायांच्या सैन्यात मुसलमान नव्हतेच

**नीतेश राणे पुन्हा बरळले**



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२** : आमच्यातील काही कारटे सांगतात की शिवाजी महाराज यांच्या सैन्यात मुस्लीम होते, कोण मुसलमान शिवरायांच्या सैन्यात नव्हते. ही लोकं उगाच टेप रेकॉर्डर चालवतात. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती. हिंदू-विरुद्ध मुसलमान होती, असे मंत्री नीतेश राणे यांनी म्हटले आहे.

आपल्या नावापुढे जी हिंदू अडनावे दिसत आहे, ती छत्रपती संभाजी महाराज यांच्यामुळे दिसत आहे. नाही तर आपल्या नावापुढे वेगळीच अडनावे दिसली असती. कुणी शेख असता तर कुणी खान असता. हिंदवी स्वराज्यांची लढाई ही इस्लामी करणाच्या विरोधातच झाली आहे, असे नीतेश राणे म्हणाले.

पुढे ते म्हणाले, औरंगजेबची कबर उखडून काढू. सरकारने काढली नाही, तर आम्ही काढू. कबर काढण्यासाठी लाँग मार्च काढू. आम्ही हिंदू म्हणून व्यासपीठावर एकत्र आहोत. कसबा शास्त्रीपूल या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज धर्मरक्षण दिन समितीच्या वतीने संभाजी महाराज धर्मरक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री नीतेश राणे बोलत होते.

नीतेश राणे म्हणाले की, औरंग्याने ज्या पद्धतीने आमची हिंदू मंदिरे तोडली. हिंदू माता-भगिणीचा छळ सुरू करत धर्म संपवण्याचा प्रयत्न केला. आमचा धर्म संपवण्याची शपथ त्याने घेतली होती. त्या औरंग्याला थांबवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी केले आहे.

दरम्यान, नीतेश राणे यांच्या या वक्तव्यानंतर नवा वाद निर्माण झाला असून, विरोधकांनी राणे यांच्यावर टीकेचा भडीमार केला आहे.

## लालपरीची झोळी रिकामीच



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आर्थिक संकटात आहे. एकीकडे गुजरात, उत्तर प्रदेश आणि कर्नाटकाने त्यांच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी अत्याधुनिक बस स्थानके आणि गाड्यांची तजवीज करीत असताना महाराष्ट्राच्या अथर्संकल्पात एसटी महामंडळ आणि कर्मचाऱ्यांची देणी चुकती करण्यासाठी कोणतीही तजवीत केलेली नाही.

केवळ सहा हजार एसटी डिझेल गाड्यांनी सीएनजी आणि एलएनजीमध्ये परावर्तित करण्याच्या जुन्या घोषणेचा पुनरुच्चार केला आहे. एसटीच्या नवीन गाड्यांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद किंवा नियोजन या अर्थसंकल्पात केलेले नाही. एसटी महामंडळाची या अर्थसंकल्पाकडून निराशा झाला झाली असून एसटीची झोळी पुन्हा एकदा रिकामी राहील्याची टीका महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे.

एसटीची सर्व प्रकारची थकीत देणी चुकती करण्यासाठी तसेच नवीन गाड्या घेण्यासाठी विधिमंडळाच्या या अर्थसंकल्पात एसटीसाठी आर्थिक मदत पॅकेज मिळेल असे वाटत असतानाच पुरेसा निधी उपलब्ध केलेला नाही. एसटीला नवीन गाड्या घेण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती स्पष्टता दिसत नाही त्यामुळे एसटीची झोळी अखेर रिकामीच राहिली असल्याचे मत मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केले आहे.

### गाड्यांसाठी २००० कोटींची गरज

या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एसटीच्या ताफ्यात स्व मालकीच्या नवीन ५००० गाड्या घेण्यासाठी आणि सहा हजार कोटीची थकीत रक्कम देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल असे वाटत होते पण तसे काहीही झालेले नाही.

थकीत रक्कम देण्यासाठी निधी देण्यात आला नसून स्व मालकीच्या नवीन गाड्या घेण्यासाठी किती निधी देणार या बाबतीत स्पष्टता नाही. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलेल्या ५००० गाड्या विकत घेण्यासाठी २००० कोटी रुपयांची गरज असून त्या बाबतीत स्पष्टता दिसत नसल्याचे बरगे यांनी म्हटले आहे.

## मोदींवर दुसऱ्या फाळणीचा ठपका ठेवला जाईल..

**नीतेश राणेंच्या वक्तव्यावरुन राऊत संतापले**



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२** : काही लोकांना या देशात दंगली घडवायच्या आहेत. त्यामुळे ते वादग्रस्त वक्तव्य करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. त्यांनी या माध्यमातून मंत्री नितेश राणे यांच्या वक्तव्यावर टीका केली.

या संदर्भात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिणार आहोत. तसेच तुमच्या लोकांना आवरा नसता, तुमच्यावर दुसऱ्या फाळणीचा ठपका ठेवला जाईल, असा इशारा देखील राऊत यांनी दिला आहे. नितेश राणे यांना आधी इतिहास समजून घ्यावा लागेल, असे म्हणत संजय राऊत यांनी नितेश राणे यांच्यावर टीका केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिली लढाई ही मुलांविरुद्ध नाही तर चंद्रराव मोरे यांच्याविरुद्ध केली होती. या मोरे यांचे वंशज काही मंत्रिमंडळात असतील, अशा शब्दात राऊत यांनी राणे यांच्यावर टीका केली आहे. इतिहास बदलण्याची प्रक्रिया ही घातक असल्याचे राऊत म्हणाले.

शिवरायांच्या तोफखान्याचा प्रमुख कोण होता? छत्रपती शिवरायांचे अंगरक्षक कोण होते? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. मात्र जे शाळेतच गेले नाही, त्यांनी इतिहास शिकला नाही. त्यांना केवळ मटणाचे दुकान दिसते. त्यांना पुन्हा एकदा दंगली घडवायच्या आहेत. ज्यांना पुन्हा एकदा हा देश फाळणीकडे ढकलायचा आहे, सातत्याने बेताल वक्तव्य करून ते समाजात तेढ निर्माण करीत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

या संदर्भात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिणार असल्याची माहिती खासदार राऊत यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. या लोकांना समज देण्याची मागणी आपण त्यात करणार आहे नसता तुमच्यावर दुसऱ्या फाळणीचा ठपका ठेवला जाईल, असा इशारा देखील राऊत यांनी दिला आहे.

## : सिनेरंग :

लोकरंजन

### मे महिन्यात तापमान वाढणार पीएसआय अर्जुन ९ मे रोजी येणार..




मराठी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी छाप उमटवणारा, सुपरस्टार अंकुश चौधरी लवकरच एका नव्या दमदार भूमिकेत झळकणार आहे. 'पी.एस.आय. अर्जुन या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख सोशल मीडियावर जाहीर करण्यात आली असून ९ मे २०२५ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

थांब म्हटलं की थांबायचं अशी चित्रपटाची टॅगलाईन असल्यामुळे यंदाच्या मे महिन्यात तापमान अधिकच गरम होणार आहे. व्हिस्ट्रोमॅक्स सिनेमा, ड्रिमविव्हर एंटरटेनमेंट निर्मित विक्रम शंकर प्रस्तुत या चित्रपटाचे दिग्दर्शक भूषण पटेल आहेत तर विक्रम शंकर आणि ध्रुव दास निर्माते आहेत. मोशन पोस्टरमध्ये अंकुशचा पोलिसांच्या वर्दीतला पी एस आय चा लूक पाहायला मिळत आहे, जो चित्रपटाच्या कथानकाविषयी अधिकच उत्सुकता निर्माण करणारा आहे. ■ ■ ■

### चंडिका चित्रपटाचे पोस्टर रीलीझ

महिलांना प्रेरणा देण्याचे कार्य समाजात केले जाते, यापैकीच महत्वाचे योगदान देतात ते म्हणजे चित्रपट. सध्या मराठी सिनेश्रुष्टीत महिलाप्रधान सिनेमांकडे प्रेक्षकांचं लक्ष वेधलं गेलं. स्त्रीकेंद्री चित्रपटांना सिनेप्रेमींचं प्रेम सुद्धा मिळतंय. असाच एक नवा मराठी चित्रपट येत्या नवीन वर्षी आपल्या भेटीस येणार आहे.

आनारसा स्टुडिओज प्रस्तुत, योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित आणि निर्मित ₹चंडिका₹ ह्या सिनेमाचं आज पोस्टर खास महिला दिनानिमित्त रिलीझ करण्यात आलंय. वन फोर थ्री (143) आणि आम्ही जरांगे सारखा दमदार आणि सर्वाधिक चर्चेत आलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक योगेश भोसले पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करायला सज्ज झालेत.

पोस्टर वर असलेल्या महिलेच्या कपड्यांवर व अंगावर सर्वत्र रक्त आहे, मागे सध्याचं जग आपण पाहू शकतो पण विशेष म्हणजे या महिलेच्या उजव्या हातात शस्त्र आहे ज्याला आपण त्रिशूल म्हणतो. या दमदार पोस्टर वरूनच हा सिनेमा किती ताकदीचा असणार आहे ह्याचा अंदाज पटतो. जशी आदिशक्ती पृथ्वीवर विविध रूपात येते कधी महालक्ष्मीच्या रूपाने, तर कधी तुळजाभवानीच्या रूपाने. दुष्ट दुर्जनांच्या नाशासाठी देवीने नाना रूपे धारण केली आणि जगाच्या उद्धाराची धुरा हाती घेतली. तसच चंडिका सुद्धा अत्याचार, द्वेष, असहिष्णुता अशा गोष्टीं वर मात देत जगाचा, महिलांचा उद्धार करणार आहे. सध्याच्या स्त्रिया सशक्त आणि सजग आहेत, पण कुठेतरी त्या देखील त्यांच्या शक्तींपासून अनभिज्ञ आहेत.




जो पर्यंत त्यांच्या विरुद्ध अत्याचाराचा घडा भरत नाही तो पर्यंत त्यांना स्वतःची क्षमता आणि आणि शक्ती ह्यांची जाणीव होणारच नाही. आता नक्की चंडिका कोण? तिचा उद्देश काय? हे नवीन वर्षात महिला दिनी कळेलच.

आनारसा स्टुडिओज प्रस्तुत आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित चंडिका सिनेमाचं लेखन आणि संगीत सुरेश पंडित ह्यांचं आहे. तर गीत वैभव देशमुख ह्यांचं आहे. ■

### 'संत सखुबाई' सन मराठी'वर

सन मराठीवर संत सखुबाई यांचा भक्तिमय प्रवास प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्यासाठी 'सखा माझा पांडुरंग' ही मालिका सोमवार ते रविवार सायंकाळी ७:३० वाजता प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. मालिकेत सखूबाईंची बालपणातील भूमिका बालकलाकार स्वराली खोमणे साकारणार आहे तर पांडुरंगाच्या भूमिकेत तेजस महाजन पाहायला मिळणार आहे.

याचसह नाटक, मालिका, चित्रपट या तिन्ही माध्यमातून प्रेक्षकांना आपलंस करून घेणारे अभिनेते सुनील तावडे नरोत्तम यांची भूमिका साकारणार आहेत. मालिकेतून संत सखूबाईंचा प्रवास, पांडुरंगाप्रती असलेली त्यांची भक्ती पाहायला मिळणार आहे. मालिकाविश्वात पहिल्यांदाच महिला संत सखुबाई यांच्या जीवनावर मालिका येत असल्यामुळे ही मालिका प्रेक्षकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे.

मालिकेत पांडुरंगाची भूमिका साकारणारा अभिनेता तेजस महाजनने या भूमिकेविषयी बोलताना सांगितले की, 'सखा माझा पांडुरंग' ही मालिका १० मार्चपासून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. पण मला अजूनही पांडुरंगाची भूमिका मी साकारत आहे यावर विश्वास बसत नाही. माझ्या कुटुंबातून सिनेविश्वात कोणी नातेवाईक नसताना इथवर पोहोचणं कठीण होतं. तेव्हापासून देव माज्याबरोबर होता. जेव्हा या भूमिकेसाठी मला संगीत कुलकर्णी सरांचा फोन आला तेव्हा मी थोड्याच वेळात त्यांना ऑडिशन पाठवली आणि त्याच दिवशी माझं या भूमिकेसाठी सिलेक्शन झालं. देव आपली परीक्षा घेत असतो हे ऐकलय पण कधी देवाची भूमिका मी साकारू शकतो हा विचार नव्हता केला. पांडुरंगाच्या वेशभूषेत मी स्वतःला पाहिलं तेव्हा बाप रे हे शब्द उच्चरले गेले.



लगेच आईला फोटो पाठवला आणि साक्षात पांडुरंग पाहून ती ही भरून पावली. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# ..त्यांच्या विचाराने महाराष्ट्राचे भले




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२** : राजकारणात काम करताना मी सुसंस्कृत महाराष्ट्र घडवणाऱ्या यशवंतराव चव्हाण साहेबांच्या शिकवणीचे कायम स्मरण करतो. त्यांच्याच विचाराने महाराष्ट्राचं भलं होणार आहे. सगळ्या घटकांना न्याय मिळणार आहे. त्यामुळं राजकीय जीवनात असेपर्यंत मी चव्हाण साहेबांची विचारधारा सोडणार नाही, असं अभिवचन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कराडच्या प्रीतिसंगमावरून दिले.

यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त कराडच्या प्रीति संगमावरील समाधिस्थळी अजित पवारांनी सकाळी अभिवादन केले. त्यानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, आज सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही लोक वादग्रस्त वक्तव्ये करत आहेत. ती वक्तव्ये सुसंस्कृत महाराष्ट्राला परवडणारी नाहीत. यापूर्वी यशवंतराव चव्हाण साहेबांसारख्या अनेक नेत्यांनी महाराष्ट्राचं नेतृत्व करताना जातीय सलोखा ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांचा सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे.

छावा चित्रपटाच्या माध्यमातून संभाजी महाराजांचा इतिहास नव्या पिढीसमोर आणण्याचं काम झाले आहे. हल्ली सर्वच पक्षांतील नेत्यांकडून वादग्रस्त वक्तव्ये केली जात आहेत. आपल्या वक्तव्यातून कायदा, सुव्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. कोणत्याही विशिष्ट समाजाबद्दल वक्तव्यं टाळली पाहिजेत, असं आवाहनही त्यांनी केले.

सरकार अर्थसंकल्प सादर करते त्याला मंत्रिमंडळ मान्यता देत असते. त्यावरही मुख्यमंत्री यांची असते. अशा शब्दात अजित पवार यांनी महायुतीमधील काही मंत्र्यांच्या विभागाला कमी निधी मिळाला असल्याच्या आरोपावर प्रत्युत्तर दिले आहे. राज्याचा सर्वांगीण विकास लक्षात ठेवून समतोल विकास कसा साधता येईल आणि गरीब घटकाला न्याय कसा देता येईल, हे बघूनच आपण अर्थसंकल्प सादर केला असल्याचे ते म्हणाले.

कोयना धरण प्रकल्पग्रस्तांचे काही प्रश्न प्रलंबित असून लवकरच बैठक लावून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही ते म्हणाले.

# 'स्वाधार'साठी अर्जासोबत बँकेचा तपशील आवश्यक

**अकोला :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांना १५ मार्चपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार असून, रक्कम खात्यात मिळण्यासाठी अर्जासोबत बँकेचा तपशील जोडणे आवश्यक आहे. त्याची पूर्तता करण्याचे आवाहन सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास, इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट वितरित करण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बँक खात्याची माहिती ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी पोर्टलवर लवकरात लवकर अर्ज व आवश्यक कागदपत्रे, तसेच आधार लिंक व केवायसी पूर्ण करण्यात आलेल्या अद्ययावत खाते, पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत आदी पूर्ण माहिती ऑनलाईन भरून त्याची प्रिंट कॉपी समाजकल्याण कार्यालयात सादर करावी. भारत सरकार शिष्यवृत्ती, विद्यावेतन मिळण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनीही हार्ड कॉपी देणे आवश्यक आहे. पोर्टलचा पत्ता 'एचएमएएस.एमएएचएआयटी.ओआरजी' असा असून, समाजकल्याण कार्यालय दक्षतानगरात निमवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन येथे आहे.

# ग्रामीण आवास योजनेद्वारे २७ हजार ८२६ घरकुलांच्या कामाला चालना

## ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी व पहिला हप्ता प्राप्त झाला,त्या सर्वांनी घरकुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे :जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी





■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
ग्रामीण आवास योजनेद्वारे जिल्ह्यात २७ हजार ८२६ व्यक्तींच्या खात्यात पहिला हप्ता जमा करण्यात आली असून, घरकुलांच्या बांधकामाला चालना देण्यात आली आहे. गरजू ग्रामस्थांना आपले हक्काचे घर मिळावे म्हणून ग्रामीण आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. केंद्रीय मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्या उपस्थितीत गत २२ फेब्रुवारीला राज्यातील १० लक्ष लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला.पहिला हप्ता जमा झाल्यानंतर कामे एकाचवेळी सुरू व्हावीत या दृष्टीने लाभार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्यात सर्व विभागप्रमुखांकडून आज प्रक्षेत्र भेटी देऊन पाहणी व लाभार्थ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. हे काम पुढे जाण्यामुळे त्यानंतरची प्रक्रियाही जलद होईल व ग्रामस्थांचे स्वगृहाचे स्वप्न साकार होईल, असे जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांनी सांगितले.अकोला तालुक्यात ५ हजार ७३४, अकोट तालुक्यात ३ हजार ८६४, बाळापूर तालुक्यात ४ हजार २६६ , बार्शिटाकळी तालुक्यात ३ हजार ५७२, मूर्तिजापूर तालुक्यात ३ हजार ३९०, पातूर तालुक्यात ४ हजार ३९०, तेल्हारा तालुक्यात २ हजार ६५० घरकुले निर्माण होत आहेत. पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, जिल्हाधिकारी अजित कुंभार, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांच्या मार्गदर्शनात मोहिम गतीने राबविण्यात येत आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, प्रकल्प संचालक मनोज जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समाधान वाघ, हरिनारायण परिहार, सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी परिश्रम घेत आहेत.

## विद्यार्थ्यांना खेळातील वाढीव गुणांसाठी ऑनलाईन अर्ज आवश्यक

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
खेळांमध्ये चमकदार कामगिरी करणा–या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण दिले जातात. त्याची प्रक्रिया आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली असून, १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी ग्रेस गुणांसाठी अर्ज शिक्षण मंडळाकडे केवळ ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने केले आहेत.कोणीही जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण मंडळास ऑफलाईन अर्ज करू नये. ते स्वीकृत केले जाणार नाहीत. वाढीव गुणांसाठी अर्ज सादर करताना मंडळाच्या नियमानुसार २५ रू चलन भरावे लागेल. त्याची प्रत प्रस्तावासोबत जोडावी. सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले सरकार ॲपचा वापर करून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरून घ्यावे. दि. १५ मार्चपर्यंत ऑनलाईन प्रस्ताव देता येतील, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट यांनी केले आहे.

# फसव्या संदेशांना बळी पडू नका

## बाल आशिर्वाद नावाची कोणतीही योजना नाही महिला व बालविकास अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
'मुख्यमंत्री बाल आशिर्वाद योजना' अशी योजना असल्याचे भासवून समाजमाध्यमांद्वारे काही संदेश प्रसारित होत आहेत. असे वृत्त केवळ अफवा असून, नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये व फसवणूकीला बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

या प्रकारच्या फसव्या संदेशांमध्ये 'दि. १ मार्च २०२० नंतर दोन्ही पालक अथवा एक पालक मृत्यू झाला आहे व बालकांचे वय १८ वर्षे पेक्षा कमी आहे अशा कुटुंबातील २ मुलांना बाल सेवा योजनेत दरमहा ४००० रु. मिळणार आहेत व त्याचे फॉर्म तहसील कार्यालयात उपलब्ध आहेत. सदर अर्ज भरून जिल्हा बाल संरक्षण कक्ष/जिल्हा परिवीक्षा अधिकारी यांच्याकडे सादर करावे' असा मजकूर प्रसारित करण्यात येत आहे.

महिला व बाल विकास विभागाकडून मुख्यमंत्री बाल आशिर्वाद योजना अशा नावाने कोणतीही योजना अस्तित्वात नसून हा संदेश केवळ अफवा आहे. त्यामुळे त्यावर विश्वास ठेवून आर्थिक नुकसान होणार नाही याबाबत दक्षता बाळगावी. अशा अफवा असलेल्या सोशल मीडिया पोस्टवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन श्री. पुसदकर यांनी केले आहे.

अनाथ किंवा एकल पालक बालकांसाठी महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, पहिला मजला, कोषागार इमारत, जिल्हाधिकारी आवार, अकोला या कार्यालयाकडे संपर्क साधावा.असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात आज साजरी करण्यात आली.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

अधिक्षक शाम धनमाने, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले. स्व. चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक विकासाचा पाया घातला. ते महाराष्ट्रात सहकाराचे जाळे विणणारे खंबीर नेतृत्व होते. पंचायत राज्याच्या माध्यमातून त्यांनी तळागाळातल्या समाजाला त्याच्या लोकशाही ताकदीचे भान दिले, अशा शब्दांत विविध मान्यवरांनी अभिवादन केले.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती



दरवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा शहरातील जनतेसाठी १७ मार्च २०२५ रोजी (तिथी नुसार) शिवजयंती जय बाभळेश्वर शिवजयंती उत्सव समितीतर्फे साजरी होत आहे प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती १०० फूट लांब व ५० फूट उंच अशी राहणार आहे.

# थोडक्यात

## सणांनिमित्त जिल्ह्यात कलम ३६ लागू

**अकोला :** होळी (१३ मार्च), धुळिवंदन (१४ मार्च), तसेच तिथीनुसार साजरी करण्यात येणारी श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती (१७ मार्च) आदी सण–उत्सव लक्षात घेऊन जिल्ह्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ नुसार आदेश लागू करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी आदेश जारी केला.विहित मार्गाने मिरवणूक, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता व बंदोबस्त, ध्वनीक्षेपक वापर मर्यादा, जमाव शिस्त व नियंत्रण आदींसाठी पोलीस फौजदार व त्याहून वरिष्ठ अधिका–यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सार्वजनिक व सुरक्षितता नियमांचे उल्लंघन करणा–या व्यक्तीवर कलम १३४ नुसार कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद आहे.

## कारागृहातुन सुटणाऱ्या गुन्हेगारांवर अकोला पोलीसांचे लक्ष

**अकोला :** आजकाल समाजामध्ये वाईट प्रवृत्ती मुळे अनेक लोक गुन्हेगारी कडे वळतात आणि चोरी, घरफोडी, जबरी चोरी, मारामारी, खून,फसवणूक अशा प्रकारचे गुन्हे करतात, आणि वेळ प्रसंगी त्यानां जेल चीं हवा खावी लागते, काही वेळा अनेक गुन्हे करून सुध्दा हे गुन्हेगार जेलमध्ये जातात, दादा, भाई गिरी, गुंडा गर्दी करणारे काही गुन्हेगार जेल मधून सुटल्यावर, मिरवणूक काढणे, रस्त्यावर केक कापणे, अशा गोष्टी करून त्याचे रिल बनवुन समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचे विविध ठिकाणी आढळून आले आहे.अश्या प्रकारच्या गोष्टींना आळा घालण्यसाठी कारगृह प्रशासन व अकोला पोलीस दल यांनी समन्वय ठेवुन कारागृहातुन सुटना–या आरोपीतांवर विशेष लक्ष देण्यात येणार आहे.मा. पोलीस अधीक्षक यांनी अशा गुन्हेगार लोकांवर लक्ष ठेवण्यासाठी सायबर सेल ला विशेष Cyber-Patroling बाबत सूचना दिल्या आहेत., जेल मधून आरोपी सुटल्यावर त्याची तात्काळ नोंद घेऊन संबंधित पोलीस स्टेशनला माहिती दिली जाते अशा गुन्हेगावर विशेष लक्ष ठेवून त्याने पुन्हा गुन्हा करू नये यासाठी, पोलीस स्टेशन स्तरावर प्रतिबंध कार्यवाही करण्यात येते, सन २०२४ मध्ये मालमत्ता व शरिरांवियध्द गुन्हे करणारे जेल रिलीज १८१ आरोपी वर तसेच सन २०२५ मध्ये जेल रिलीज १३ आरोपीतावंर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

# होळी सणासाठी सुरक्षा व स्वच्छता तसेच व्यवस्थेच्या उपाययोजना करा

## सलमान खान फाउंडेशनच्या संचालिका व अकोला महिला शहर कांग्रेस उपाध्यक्ष कशीश खान यांचे निवेदन

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
हिंदू धर्मात होळी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, मात्र या काळात काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे. आपल्या जिल्ह्यात होळी सणाच्या निमित्ताने सुरक्षेसाठी आणि शहरातील स्वच्छता आणि व्यवस्था उत्तम राहण्यासाठी, उपाययोजना कराव्यात अशी मागणी सलमान खान फाउंडेशन च्या संचालिका व अकोला महिला शहर कांग्रेस उपाध्यक्ष कशीश खान यांनी केली आहे.

होळी सणानिमित्त शहरातील रस्ते आणि अंतर्गत सफाई: तसेच होळीनंतर रंगपंचमी साजरी केली जाते. त्यामुळे रंग पर्यावरण पुरंक असावेत. तसेच सफाई योग्य पद्धतीने केली जावी. शहरातील व जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणी रंगामूळे विद्रूपीकरण व कचरा काढण्यासाठी कर्मचांयांची योग्य व्यवस्था करण्यात यावी. तसेच, होळीच्या सणानंतर सफाई करण्यासाठी यंत्रणांचा वापर वाढवावा., जैविक रंगांचा वापर आणि प्राणी



सुरक्षा करण्यासाठी जैविक रंगांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करावे , ज्यामुळे पर्यावरणाचे नुकसान कमी होईल. तसेच, प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी काळजी घेतली जाईल.

घरगुती प्राणी आणि रस्त्यावर फिरणारे मोकाट प्राणी सुरक्षित ठिकाणी ठेवावेत. रंगांचे प्रयोग प्राण्यांवर न होण्याची आवश्यकता आहे. होळी खेळताना पाणी वापरले जाते, त्यामुळे सर्व भागांमध्ये मुबलक पाणी पुरवठा व्हावामात्र पाण्याची नासाडी होणार नाही याची काळजी घ्यावी . पाणी बचतीच्या उपाययोजना कराव्यात आणि सार्वजनिक ठिकाणी पाणी वापरण्यासाठी पाणी पुरवठा केंद्र स्थापन करावेत.

नशेत वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई: होळीच्या काळात नशेत वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जावी. दारू पिऊन वाहन चालवण्यामुळे अपघात होऊ शकतात. त्यासाठी तपासणी दुरुस्त करावी आणि ड्रायव्हिंग अंडर द इन्फ्लुएंस (ऊगख) कायद्याच्या उल्लंघनावर कडक कारवाई केली जावी.

या काळात गुन्हेगारी संबंधी तक्रारी वाढू शकतात. त्यासाठी पोलिसांनी अधिक गस्त वाढवावी आणि धोके टाळण्यासाठी नागरिकांना कायद्यासंबंधी जागरूक करावे. अत्याचार, चोरी किंवा मारामारीसारख्या गुन्ह्यांच्या बाबतीत कडक कारवाई केली जावी. प्रशासनाने यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात अशीही मागणी सलमान खान फाउंडेशनच्या संचालिका व अकोला महिला शहर कांग्रेस उपाध्यक्ष कशीश खान यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## जागतिक किडनी दिवशी वॉकेथॉन

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
किडनीच्या आजारांबद्दल लोकांना जागरूक करणे. किडनीच्या आजारांचे लवकर निदान आणि उपचार करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करणे. किडनीच्या रुग्णांना मदत करण्यासाठी जनजागृती करण्यासाठी जिल्हा रुग्णालय ते आयएमए हॉल या ठिकाणी आज वॉकेथॉन आयोजित करण्यात आली. या वेळी डॉ. प्रशांत मुळावकर यांनी या वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखविली.किडनीच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे. किडनीच्या आजारांचे प्रमाण कमी करणे.किडनीच्या आजारांवर वेळीच उपचार करणे आदी कामासाठी जनजागृती करण्यात आली. किडनी रक्तातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्यात मोलाची मदत करते. शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवणे. रक्तदाब नियंत्रित ठेवणे.

# अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांसाठी ई–केवायसी आता अधिक सुलभ

■'मेरा केवायसी' ॲप्लिकेशन उपलब्ध
■जिल्हा पुरवठा अधिकारी निखिल खेमनार यांची माहिती

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत शिधापत्रिकाधारकांना ई–केवायसी पूर्ण करणे बंधनकारक असून, ती दि. ३१ मार्चपूर्वी पूर्ण करून घ्यावी. त्यासाठी आता 'मेरा केवायसी' हे ॲपही उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रक्रिया सोपी–सुलभ झाली आहे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी निखिल खेमनार यांनी केले आहे.

गरजूंना धान्याचा लाभ सुरळीत सुरू राहावा यासाठी शासनाने शिधापत्रिकाधारक प्रत्येक लाभार्थ्याची ई–केवायसी बंधनकारक केली आहे. त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत लाभार्थ्यांनी रास्त भाव दुकानांमध्ये जाऊन ई–पॉस मशिनद्वारे ई–केवायसी प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करून घेण्यात यावी, लाभार्थ्यांना घरबसल्या आता ई– केवायसी करता येणार आहे. लाभार्थी दुकानात न जाता स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबाचे केवायसी पूर्ण करू शकतील. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सूचना केंद्राच्या सहकार्याने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे.

ही प्रणाली राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत ज्या लाभार्थ्यांनी रास्त भाव दुकानांमध्ये जाऊन ई– केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नसेल त्यांनी ॲपचा वापर करावा, असे आवाहन श्री. खेमनार यांनी केले.

# आदर्श कन्या विद्यालयात नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळा उत्साहात संपन्न





■अकोला,दि १२ (प्रतिनिधी):
निसर्गातील विविध घटकांचा उपयोग करून सुरक्षित व पर्यावरणपूरक रंगांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने आदर्श कन्या विद्यालय व कला कनिष्ठ महाविद्यालय, मुर्तीजापुर येथे नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थिनींना निसर्गातील सहज उपलब्ध घटकांपासून रंग कसे तयार करावे याचे मार्गदर्शन श्री. प्रकाश सु. निरखे यांनी केले.

### निसर्गसंपन्न रंगनिर्मितीचा अनोखा अनुभव

या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी कडुलिंबाची भुकटी, हळद, कापूर, गुलाबजल, चंदन, मुलतानी माती, पालकाची पाने, कॉर्न फ्लोअर, बीट आणि पळसाची फफुले या घटकांचा वापर करून विविध रंग तयार केले. हिरवा रंग पालकाच्या पानांपासून, लाल रंग बीट व कॉर्न फ्लोअरपासून तर केशरी रंग पळसाच्या फफुलांपासून तयार करण्यात आला. या रंगनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये मुलींनी स्वतः हाताळणी करून प्रत्यक्ष अनुभव घेतला.

### नैसर्गिक रंगांच्या वापराचे महत्त्व

बाजारात मिळणारे केमिकलयुक्त रंग आरोग्यासाठी हानिकारक असतात. त्याच्या संपर्कामुळे त्वचा समस्या, ॲलर्जी आणि डोळ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर नैसर्गिक रंग वापरणे अधिक सुरक्षित आहे. विद्यार्थिनींना या रंगांची ओळख करून देत त्यांचा उपयोग वाढवावा, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा गावंडे यांनी विद्यार्थिनींना नैसर्गिक रंग वापरण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन केले.

### कार्यशाळेचा यशस्वी आयोजन आणि मान्यवरांचे कौतुक

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्री गाडगे महाराज विद्यालय मंडळाचे अध्यक्ष सुहासराव तिडके आणि सचिव शिरीष तिडके यांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रमोद पोळकट यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती शीला सरोदे यांनी केले.

### उपक्रमाच्या यशासाठी समर्पित योगदान

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी तायडे मॅडम, काळेकर मॅडम, कल्पना तिडके, वैष्णवी जोगी, वैष्णवी डवंगे, गोविंद आजळकर आणि रेखाताई शेळके यांनी परिश्रम घेतले.हा उपक्रम विद्यार्थिनींसाठी एक अनोखा अनुभव ठरला. त्यांनी तयार केलेले नैसर्गिक रंग त्यांना भेट म्हणून देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश पोहोचला आणि नैसर्गिक रंगनिर्मितीबाबत त्यांची उत्सुकता व आवड वाढली.

# पातूर ते मालेगाव रोडवर भीषण अपघात–दोघे गंभीर जखमी

■पातुर,दि १२ (प्रतिनिधी):
पातूर ते मालेगाव रोडवर पातुर नजीक असलेल्या बोडखा गावासमोर मुख्य रस्त्यावर भीषण अपघात झाला. मेडशी येथून बर्शिटकलीकडे जात असताना एका वाहनाचा मोठा अपघात झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत गोपीचंद झ्याटे आणि मनीषा झ्याटे हे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे पोलिस सूत्रांकडून समजते.अपघात होताच तातडीने मदत कार्य सुरू करण्यात आले. NHAI १०३३ हायवे अँब्युलन्स घटनास्थळी पोहोचली. इन्सिडेंट मॅनेजर अनिकेत पोहरे, हायवे पेट्रोलिंग ऑफिसर अक्षय पोहरे, अँब्युलन्स ड्रायव्हर भारत अंभोरे आणि डॉक्टर अक्षय गायकवाड यांनी तत्काळ मदत केली. जखमींना तातडीने अकोला येथे हलवण्यात आले आहे.अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करत आहेत. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. या रस्त्यावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# विद्रोहाचा रगदार स्वर बुलंद करणारे विद्रोही साहित्य संमेलन!

महापुरूषांचे तेजस्वी विचार काळजावर कोरून घेतल्याशिवाय, खरी तळमळ असल्याशिवाय प्रबोधन करणारी सकस सांस्कृतिक चळवळ उभी राहत नाही. ज्या महात्मा फुलेंनी कट्टर प्रतिगाम्यांच्या पुणे शहरातून तुच्छतावाद्यांना लाजवत पुरोगामी चळवळ उभी केली; त्याच पुण्यातून आयु. किशोर ढमाले व प्रा. प्रतिमा परदेशी या समर्पित दांपत्याने प्रबोधनाचा प्रण प्रत्यक्षात उतरऊन दाखवला.

---------------

संविधानिक मूल्यांना समर्पित विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याच्या अध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी व संघटक किशोर ढमाले आहेत. मी धुळे जिल्ह्यात नोकरी केली. त्यामुळे किशोर भाईंना अनेक वर्षांपासून ओळखतो. धुळे, शहादा, नंदूरबार ही त्यांची आंदोलन भूमी राहिली आहे. हे झपाटलेले दांपत्य जिथे अ.भा. मराठी साहित्य संमेलन असते तिथे विद्रोही मराठी साहित्य संमेलन घेत असते.

हे संमेलन श्रमिकांच्या कष्टकऱ्यांच्या मूठभर धान्य व एक रूपया मदतीच्या उमीर्तून घेतले जाते. त्यामुळे कोट्यवधी रूपयांच्या गुमीर्तून उभारलेल्या अ. भा. संमेलनाचा मूल्यात्मक फोलपणा उघडा पडतो. मला या संमेलनाला कधी बोलवले गेले नाही. पण मी पुरोगामी लेखक व विद्रोही कवी म्हणून अमळनेर व संभाजीनगरच्या संमेलनाला श्रोता म्हणून उपस्थित राहिलो.

या संमेलनाने अस्मितादर्श साहित्य संमेलनाची उणीव भरून काढलीय. मी जालना येथे झालेल्या पस्तीसव्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचा संमेलनाध्यक्ष होतो. डॉ. गंगाधर पानतावणे सरांनी निवडलेला मी शेवटचा अध्यक्ष होतो. या वर्षी विद्रोही साहित्य संमेलन ॲड. के. ई. हरिदास, प्रा. राम प्रसाद तौर, इंजिनिअर सतीश चकोर, ॲड. धनंजय गोरडे यांच्या पुढाकाराने संभाजीनगर येथे झाले. भरगच्च वैचारिक शिदोरी देणारे सकस साहित्य संमेलन असे त्याचे वर्णन एका वाक्यात करता येईल. तरी अशा संमेलनाला शासकीय आर्थिक मदत का मिळत नाही ? हा चिंतेचा विषय आहे. शासनाला अशा संमेलनांना मदत करायची सुबुद्ध होवो !

महाराष्ट्र प्रदेशात अंकुर साहित्य संमेलन आजही सुरू आहे. स्मृतिशेष हिंमत शेकोकार नावाच्या एका कलंदर तरूणाने लोकाश्रयातून या संमेलनाची सुरवात केली. बहुजन साहित्य संमेलन, साहित्यिक कलावंत साहित्य संमेलन नगरसेवक दिलीप बराटे यांनी हे पुणे येथे भरवतात.

शंकर घोरसे नावाचे ध्येयधुंद वऱ्हाडी कामगार साहित्यिक अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय महोत्सव नागपूर येथे २८, २९ डिसेंबरला रेशिमबाग नागपूर येथे घेतला. मी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होतो. लोकाश्रयावर हे संमेलन यशस्वी झाले. प्रा. विनायक तुकाराम हे कवी समीक्षक-विचारवंत म्हणून परिचित आहेत. तेही संमेलन घेतात.

सांस्कृतिक सत्ता ही सर्व सत्तांची सत्ता असते. ती सोडायलाही लोक तयार नसतात. सत्ता नसतांना किशोरभाई व प्रतिमाताई यांनी सुरू केलेला हा सांस्कृतिक-वाङ्मयीन लोकजागर आजच्या प्रतिक्रांतीच्या वेळी खूप मोलाचा ठरत आहे.

विद्रोही संमेलनात महत्वाच्या गटचर्चा होतात. त्यात अभ्यासूंकडून ग्रंथालय चळवळ, जल-जंगल-जमीन अधिकाराचा प्रश्न आणि कंपन्यांचे आक्रमण, माध्यमांची गळचेपी की शरणागती, मराठवाडा : जातीय ध्रुवीकरणाकडून जातीयुद्धाकडे की जाती अंताकडे? जातीनिहाय जनगणना, पाणीप्रश्न, शैक्षणिक धोरण-मनुवादाचे नुतनीकरण, कृत्रिम मेंदूचे मानवी संस्कृतीसमोरील आव्हान, न्यायालये न्याय देवता का? अशा अनेक ज्वलंत प्रश्नांवरही या संमेलनात गंभीर चर्चा चिंतन घडवले जाते. याऊलट मणभर पैसे उधळणाऱ्या संमेलनातून कणभर तरी शुद्ध विचार मिळतो का? असा विचार विज्ञासू विवेकी श्रोत्यांच्या मनात येतो.

विद्रोहीच्या संमेलनात प्राचार्य वृषाली रणधीर यांचा होय, मी सावित्री ज्योतीराव फुले बोलते हा एकपात्री प्रयोग पाहून श्रोते धन्य होतात. रणधीर अभिनय सम्राज्ञीच आहेत. त्या प्रत्येक तत्कालीन प्रसंग आपल्या दमदार अभिनयातून आणि कणखर आवाजातून जिवंत करतात !

विद्रोहीच्या सूत्रधार दांपत्याने शोधून काढलेलं हे माणिक लाख मोलाचं आहे. कथा-कविता-परिसंवादांची अशी वैचारिक भरमार या संमेलनात औषधालाही सापडत नाही.

सावित्रीमाईंनी पहिली मुलींची शाळा सुरू करताच धर्म बाटला अशी निरर्थक वल्गना करणाऱ्यांच्या अनुयायांनी हा एकपात्री प्रयोग पाहून मान शरमेने खाली घालावी! महात्मा फुले



व सावित्रीमाई नसत्या तर एवढ्या मुली शिकल्या असत्या का ?

अखिल मानवजातीला सुंदर बनवणाऱ्या साधनेचं नाव साहित्य असतं! हे हिन्दीचे थोर साहित्यिक हजारीप्रसाद द्विवेदी यांनी म्हटलंय. म्हणूनच विद्रोही साहित्य संमेलनात लेखक-कलावंतांचा सन्मान होतो. किशोर ढमाले व प्रतिमाताई प्रत्येक सत्राकडे स्वतः लक्ष देऊन ते यशस्वी करतात ! आजच्या कठीण महागाईच्या काळात संमेलन घेणं खूप कठीण झालंय. या दांपत्याला माणसं जोडायची कला अवगत आहे. मराठवाड्याचे थोर कवी श्री. दि. इनामदार म्हणतात....

*ग्रंथ थकले ग माय*
*संत थकले ग माय*
*नाही थकला भीमाचा*
*काटे तुडविता पाय!*

घसा बसला तरी हे दांपत्य थकत नाही, झुकत नाही. अडथळ्यांचा काटेरी मार्ग तुडवत संमेलन यशस्वी करून दाखवतात. त्यांचं हे कार्य स्तुत्य व अभिनंदनीय आहे.

किशोर ढमाले नि प्रतिमा परदेशींनी अफाट परिश्रम घेवून विद्रोही सांस्कृतिक चळवळ उभी केली. त्यांनी घडवलेल्या कवी-लेखक-विचारवंतानी श्री.दिं. च्या शब्दात...

*सूर्य उगवला उठा उठा रे*
*प्रकाश दे हाका*
*आयुष्याच्या तेजावरती*
*पाय पुढे टाका!*

असे ब्रीद मिरवणाऱ्या लेखकांना समोर आणलं. ही बाब मला खूप महत्वाची वाटते. विवेक सुरक्षित ठेवणारे साहित्य समोर आणणे हे काम मोलाचे आहे. हे जाणवल्याने मला हा लेख लिहावासा वाटला.

अभिनिवेश न बाळगता साधेपणाने वावरणाऱ्या या दांपत्याला समजून घेणे गरजेचे आहे. त्यांची नोंद घ्यायची सुबुद्धी शासनकर्त्यांना होणार नाही, त्यांना तशी गरजही नाही. पण सत्य की जय म्हणत आयुष्य खपवायची प्रतिज्ञा करणाऱ्या, म. फुले सावित्रीमाईंचं काम नेटाने पुढे नेणाऱ्या दांपत्याला बळ देणे गरजेचे आहे.

प्रत्येक संमेलनात विद्रोही पत्रकार निरंजन टकले यांचे तडाखेबंद भाषण ठरलेलेच असते. त्यांनी संभाजीनगरच्या संमेलनात संविधान आणि लोकशाहीला कार्पोरेट मनुवाद्यांचे आव्हान या विषयावर चिंतनीय घणाघाती भाषण केले. त्यांनी सत्तेची तळी उचलून धरणाऱ्यांना आसूड उगारून धुतले. डोळ्यात अंजन घालणाऱ्या त्यांच्या भाषणांची ऑडियो, व्हीडिओ कॅसेट सर्वत्र जायला हवी. ते झुंजार वक्ते आहेत. खरंतर...

निर्धार उर्जापूर्ण असला की
वादळही थोपवता येते
समतेच्या शत्रूंना कबरीत झोपवता येते!..
(वज्रमूठ डी.बी. जगत्पुरिया)

मनुवाद्यांना नामोहरम करण्याची रग त्यांच्या धगदार वाणीत आहे. संमेलन म्हटले की काही मिरवणारेही येऊन जातात. महापुरूषांचे विचार मुरवलेले अस्सल लोक राहून जातात. उद्घाटक म्हणून या संमेलनात नामवंत हिन्दी लेखकाला बोलवलं जातं.

भूख, बेकारी, घुटन, उपवास लिखना
जब कभी इस देशका इतिहास लिखना

मानवी विवेक शाबूत ठेवणाऱ्या या संमेलनात याचेच चिंता-चिंतन होते. विद्रोहाचा दडपलेला विद्रोही स्वर बुंलद करणाऱ्या या दांपत्यास खूप खूप शुभेच्छा !

■ ■ ■



डी. बी. जगत्पुरिया
9860485398
मीरानगर, पडेगांव,
औरंगाबाद.

# मुंबईत वर्चस्व मराठीचेच...

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी (सुरेश) जोशी यांनी मुंबईत येऊन घाटकोपरची भाषा गुजराती असून मुंबईत येणाऱ्यांनी मराठी भाषा शिकलीच पाहिजे असे नाही, असे वक्तव्य केले. भैयाजींच्या वक्तव्यावर सत्ताधारी महायुतीमधील मित्रपक्ष अस्वस्थ झाले पण त्यांनी नाराजी व्यक्त केली नाही. युतीचा धर्म म्हणून ते शांत बसले असावेत, स्वतः मुख्यमंत्र्यांना मात्र महाराष्ट्र व मुंबईची भाषा मराठीच आहे अशी भूमिका मांडावी लागली. नंतर भैयाजी जोशींनीही खुलासा केला. पण त्यांनी आपण अनवधानाने बोललो असे म्हटले नाही. भैयाजींच्या वक्तव्यानंतर मुंबईत मात्र नवा वादंग निर्माण झाला.

महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत चालू आहे, नेमके त्याच काळात भैयाजींनी मुंबईत येणाऱ्याला मराठी शिकण्याची गरज नाही, असे सांगणे म्हणजे सरकारला अडचणीत आणण्यासारखे होते. स्वतः मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, मुंबईची, महाराष्ट्राची व राज्य सरकारची भाषा मराठीच आहे, महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकले पाहिजे, मराठी बोलले पाहिजे, याविषयी भैयाजी जोशींचे दुमत असेल असे वाटत नाही.

फडणवीस यांनी मराठीचा मुद्दा विरोधी पक्षांनी पेटविण्यापूर्वीच त्यावर आपली भूमिका मांडून वातावरण शांत राहील, असा प्रयत्न केला हा त्यांचा मुत्सद्दीपणा आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे, तसेच देशाची आर्थिक राजधानी आहे. गेल्या काही वर्षांत मुंबई व महाराष्ट्रातील अनेक उद्योग, मोठ्या संस्था, केंद्रीय कार्यालये मुंबई बाहेर गेले.

मुंबईत आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र होणार होते, तेही गुजरातला हलवले. त्यावर विरोधी पक्षांनी आवाज उठवला. पण अशा निर्णयांनी मुंबईतील मराठी भाषिकांना काहीच वाटत नाही असे समजायचे का? मुंबईत येणाऱ्यांनी मराठी शिकायची गरज नाही, घाटकोपरची भाषा गुजराती आहे, असे भैयाजी बोलले, त्यामुळे मुंबईतील मराठी भाषिक सुखावला आहे, असे मानायचे का? दीड कोटी लोकसंख्येच्या मुंबईत एक कोटींहून अधिक अमराठी आहेत हे वास्तव आहे. पण या अमराठी लोकांना आपले म्हणून मुंबईतील मराठी भाषकांनी सामावून घेतले आहे याकडे कसे दुर्लक्ष करता येईल.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळायला पाहिजे यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने जे अभूतपूर्व आंदोलन केले. दि. ६ फेब्रुवारी १९५६ रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे यासाठी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकी, संतपूर, डांग, उंबर गावांसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा घोषणा देऊन संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबईत मोठे लढे दिले.

सेनापती बापट, एस. एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, टी. आर. नरवणे, केशवराव जेधे, प्रबोधनकार ठाकरे, ना. ग. गोरे, दादासाहेब गायकवाड, नाना पाटील, उद्धवराव पाटील, भाऊसाहेब राऊत, ग. त्र्यं. माडखोलकर, अमर शेख, मधू दंडवते, जयंतराव टिळक अशी अनेक दिग्गजांची नावे सांगता येतील की, त्यांनी रस्त्यावर आणि विधिमंडळात लढे देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवला आहे. याच मुद्द्यावर पंडित नेहरूंशी मतभेद झाल्याने चिंतामणराव देशमुखांनी केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता.

आचार्य अत्रेंनी मराठामधून पंडित नेहरू, मोरारजी देसाई व यशवंतराव चव्हाणांच्या महाराष्ट्रविरोधी भूमिकेवर टीकेची झोड उठवली होती. १०६ जणांच्या बलिदानातून आणि शेकडो मराठी भाषिकांनी सांडलेल्या रक्तातून मुंबई महाराष्ट्राला राजधानी म्हणून मिळाली आहे.

जोपर्यंत आकाशात सूर्य-चंद्र आहेत, तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, असे मराठी माणसाला डिवचणारे वक्तव्य मुंबई काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष स. का. पाटील यांनी केले होते. येत्या पाच हजार वर्षांत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, असे भाकीत याच गुजराती भाषिक पाटलांनी वर्तवले होते.

अत्रेंनी तर मराठातून मोरारजी देसाईंना कसाई, नेहरूंना औरंगजेब, तर यशवंतराव चव्हाणांना सूयाजी पिसाळ अशी पदवी बहाल केली होती. मुंबई हे द्वैभाषिक राज्य करण्याचा निर्णय संयुक्त महाराष्ट्र आंदोनाने उधळून लावला आणि दि. १ मे १९६० रोजी रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. ज्यांना संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा इतिहास ठाऊक आहे, ते कोणीही मुंबईत मराठी भाषा आली नाही तरी चालेल असे म्हणण्याचे धाडस करणार नाहीत.

अनेकदा गुजराती लोक मराठी लोकांना कमी लेखतात, अशा घटना अधून मधून घडत असतात. गुजराती वस्ती असलेल्या सोसायटीत मराठी लोकांना घरे मिळत नाहीत. मराठी लोकं मांसाहारी आहेत असे कारण सांगून त्यांना घरे नाकारली जातात. मुंबईत भूमिपुत्रांनाच घरे नाकारली जातात, यावरून अनेकदा रस्त्यावर असंतोष प्रकट होतो. आज मुंबईत मराठी माणूस जागरूक व संघटित आहे.

मुंबई तुमची - भांडी घासा आमची, असे मग्रुरीचे बोलणे आता मुंबईत ऐकायला मिळत नाही. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी शिवसेना स्थापन केली तेव्हापासून मराठीचा आणि मराठी माणसाचा दबदबा वाढला हे वास्तव आहे.

मराठी माणसाला मुंबईत ताठमानेने उभे केले, ते शिवसेनाप्रमुखांनीच. आजही मुंबईचे आकर्षण सर्व देशाला आहे. मुंबई हे २४ तास धावणारे महानगर आहे. अहोरात्र या महानगरात खायला-प्यायला मिळते आणि बस, टॅक्सी, रिक्षा असे वाहनही मिळते. रात्रीचे ४ तास वगळता मुंबईची जनवाहिनी ओळखली जाणारी उपनगरी वाहतूक हे तर मुंबईचे वेगळेपण आहे. शिवाय ट्रान्स हार्बर, मेट्रो, मोनो रेल आहेतच. चेन्नईपेक्षा जास्त तमिळ, बंगळूरुपेक्षा जास्त कन्नड, लखनऊ-पाटणापेक्षा जास्त हिंदी, तिरुअनंतपुरमपेक्षा जास्त मल्याळी, हैदराबादपेक्षा जास्त तेलुगू भाषिक मुंबई महागरात आहेत.

मुंबई हे बहुभाषिक किंवा कॉस्मॉपोलिटीन असले तरी मुंबईवर वर्चस्व मराठी भाषिकांचेच आहे. पोलीस स्टेशन्स, तहसील, रेशनिंग, टपाल कार्यालये, म्हाडा, सिडको, मंत्रालय किंवा राज्याची, सरकारची व निमसरकारी कार्यालये सर्वत्र मराठीचाच वावर आहे. पंचतारांकित हॉटेल्स, मॉल्स, उद्योग समूहांची कार्यालये, अगदी आयकर कार्यालये किंवा बँका सर्वत्र मराठी भाषिक अधिकारी व कर्मचारी दिसतात. विमानतळावरही मराठी लोक मोठ्या संख्येने आहेत. मग मुंबईत मराठी भाषा आली नाही तरी चालू शकते, हा शोध कोणी लावला?

मुंबई शेअर बाजार असो किंवा हिंदुजा, लीलावती, बॉम्बे, जसलोक, ब्रीज कॅण्डी, अंबानी, नानावटी अशी मोठी आणि पंचतारांकित इस्पितळे असोत, सर्वत्र मराठी टक्का आहे. चित्रपट-रंगभूमी क्षेत्रातही मराठी झेंडा डौलाने फडकतो आहे. उघडा डोळे-बघा नीट, मुंबईवर मराठीचेच वर्चस्व आहे व यापुढेही राहील.

मुंबई हे कॉर्पोरेट, बिझनेस, फायनान्शियल शहर आहे. म्हणूनच मराठी, हिंदी, इंग्रजी अशी तीनही भाषांमध्ये येथे व्यवहार होतो. घाटकोपर, मुलुंड, कांदिवली, बोरिवली अशा भागांत गुजराती लोक मोठ्या संख्यने आहेत. मुंबईत उत्तर भारतीय लोकांची संख्या गुजराती लोकांपेक्षा जास्त आहे. म्हणून कोणी मुंबईची भाषा हिंदी आहे असे म्हणत नाही.

मुंबईने कोणत्याही भाषेला विरोध केलेला नाही, पण आपली मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी परंपरा कधी सोडली नाही. गुढीपाडवा, गणेशोत्सव, दहीहंडी, होळी-धुळवड, दसरा-दिवाळी हे सण मराठी भाषिक मुंबईत दणक्यात साजरे करतात व त्यातूनच मराठी भाषिक शक्तिशाली आहेत याचे दर्शन सर्व देशाला घडत असते. मराठी भाषा व मराठी अस्मिता ही मुंबई-महाराष्ट्राची ओळख आहे. बटाटा वडा, वडा-पाव, पुरणपोळी, कांदा भजी, भरली वांगी, लाडू-करंजी, चकली-कडबोळी-अनारसे, साबुदाण्याची खिचडी, मिसळ पाव, पिठलं-भाकरी, श्रीखंड-पुरी, बासुंदी, साखरभात, जिलेबी, खीर अशा मराठी पदार्थांनी सर्व देशाला वेड लावले आहे.

रोजगाराच्या शोधात वर्षानुवर्षे परप्रांतीयांचे विशेषतः हिंदी भाषक राज्यातून मुंबईवर लोंढे आदळतच आहेत. मुंबईत झोपडपट्टी रहिवाशांना मोफत घरे मिळतात, महापालिकच्या शाळांत शिक्षण, गणवेष, वह्या-पुस्तके, दप्तर, रेनकोट, चपला-बूटही मोफत मिळतात. सरकारी व महापालिका इस्पितळात उपचार मोफत मिळतात. मुंबई कोणाला उपाशी ठेवत नाही ही या महानगराची खासियत आहे. रिक्षा, टॅक्सी, फेरीवाले, भाजीवाले, मजूर, अशा अनेक क्षेत्रांत अमराठी लाखोंच्या संख्येने आहेत. त्यांनी कामचलावू मराठी शिकावे, मराठी बोलावे असा सल्ला त्यांना कोणी देत नाही, उलट मुंबईत येणाऱ्यांना मराठी भाषा शिकण्याची गरज नाही असे सांगितले जाते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः उत्तम मराठी बोलतात. पीयूष गोयल, मंगल प्रभात लोढा, मनोज कोटक, मिहीर कोटेजा, प्रकाश मेहता, मिलिंद देवरा, चंद्रिका केनिया, सुरेशदादा जैन, अरुण गुजराथी, अतुल शहा, योगेश सागर, गोपाळ शेट्टी, संजय निरुपम, कृपाशंकर सिंह, जयवंतीबेन मेहता, सुमन शहा, हेमराज शहा अशी अनेक अमराठी मोठी नावे सांगता येतील की ते अस्सल मराठी बोलतात. राजकारणी, डॉक्टर्स, चार्टर्ड अकाऊंटंट, व्यापारी, हॉटेल व्यावसायिक, दुकानदार, उद्योजक मराठी बोलतात मग मुंबईत येणा ऱ्यांना मराठी शिकण्याची गरज नाही, असे सांगणे कुणाच्या भल्यासाठी आहे?

■ ■ ■

## अमृतपाल यांच्या सदस्यत्वावर लवकरच निर्णयाची शक्यता

संसदेच्या विशेष समितीने पंजाबमधील खदूर साहिबचे खासदार अमृतपाल सिंग यांना 54 दिवसांची अनुपस्थिती रजा मंजूर करण्याची शिफारस केली आहे. अमृतपाल सिंग एप्रिल २०२३ पासून राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत (ठरअ) आसाममधील दिब्रुगड तुरुंगात बंद आहेत. अटकेमुळे संसदेत अनुपस्थित राहण्याची परवानगी मागण्यासाठी त्यांनी लोकसभा अध्यक्षांना दोन विनंत्या सादर केल्या होत्या.

खासदार अमृतपाल सिंह यांनी ५४ दिवसांसाठी रजेसाठी अर्ज केला होता - २४ जून ते २ जुलै (९ दिवस), २२ जुलै ते ९ ऑगस्ट (१९ दिवस) आणि २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर (२६ दिवस).

**लोकसभा सदस्यत्व संकटात**

अमृतपाल सिंग यांनी त्यांच्या याचिकेत म्हटले आहे की जर ते सलग ६० दिवसांपेक्षा जास्त काळ गैरहजर राहिले तर त्यांची खदूर साहिब संसदीय जागा धोक्यात येईल आणि त्यामुळे त्यांचे १९ लाख मतदार प्रतिनिधित्वापासून वंचित राहतील. संसदेच्या नियमांनुसार, जर एखादा खासदार सलग ६० दिवस सभागृहात उपस्थित राहिला नाही आणि त्याची अनुपस्थिती मंजूर झाली नाही तर त्याचे सदस्यत्व रद्द केले जाऊ शकते.

**समितीच्या शिफारसी आणि अध्यक्षपद**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी खासदारांच्या रजा विनंत्यांवर विचार करण्यासाठी १५ सदस्यांची समिती स्थापन केली होती, ज्याचे अध्यक्ष भाजप खासदार आणि त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब आहेत. अमृतपाल सिंग यांच्या विनंतीवर विचार केल्यानंतर, समितीने त्यांना अनुपस्थितीसाठी रजा देण्याची शिफारस केली आहे. तथापि, अंतिम निर्णय लोकसभा अध्यक्ष घेतील.

अमृतपाल सिंग यांच्या संसदीय उपस्थितीबाबतच्या याचिकेवर सुनावणी करताना, केंद्राने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाला कळवले की समिती १० मार्च रोजी त्यांच्या शिफारशी सादर करेल. समितीच्या शिफारशी गोपनीय असल्याने, त्या सादर होईपर्यंत त्या सार्वजनिक करता येत नाहीत.

राजकीय आणि कायदेशीर परिणाम अमृतपाल सिंग यांच्या अटकेबद्दल आणि त्यांच्या राजकीय भविष्याबद्दल पंजाबमध्ये आधीच बरीच चर्चा सुरू आहे. त्यांच्या अनुपस्थितीबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. आता सर्वांच्या नजरा लोकसभा अध्यक्षांच्या अंतिम निर्णयाकडे लागल्या आहेत.

■ ■ ■

### कोण आहे अमृतपाल सिंग



अमृतसरच्या जल्लूपूर खेडा गावचा रहिवासी

| 2012 | 2022 | 2022 |
|---|---|---|
| कामाच्या संबंधात दुबईला गेला होता | सप्टेंबरला दुबईहून भारतात परतला | सप्टेंबरमध्येच तो वारीस पंजाब देचा प्रमुख झाला |

### या घटनांमुळे आला चर्चेत

- 9 डिसेंबर — कामाच्या संबंधात दुबईला गेला होता
- 13 डिसेंबर — जालंधर गुरुद्वाराची तोडफोड
- 15 फेब्रुवारी — अजनालामध्ये अमृतपाल सिंगवर मारहाणीचा गुन्हा
- 23 फेब्रुवारी — अमृतपाल सिंगचा समर्थकांसह अजनाला पोलीस ठाण्यावर कब्जा

## फुलांपासून बनवा सुगंधित सेंद्रिय रंग



रंगपंचमी हा सण १४ मार्च म्हणजेच शुक्रवारी देशभरात आणि देशाबाहेर सुद्धा साजरा केला जाईल. र एकमेकांना रंग लावताना या गोष्टी लक्षात ठेवा कि तुम्ही विकत आणलेलं रंग हे रसायनमुक्त तसेच शुद्ध असणे खूप महत्वाचे आहे, म्हणून तुम्ही घरच्या घरी फुलांपासून रंग तयार करू शकता. तुम्ही वेगवेगळ्या रंगांच्या फुलांपासून रंगीबेरंगी रंग बनवू शकता आणि ते स्वतः रंगपंचमी खेळण्यासाठी वापरू शकता.

**गुलाबी रंग :** प्रथम गुलाबाची पाने धुऊन स्वच्छ करा आणि नंतर मिक्सरमध्ये चांगले बारीक करा. गरजेनुसार कॉर्नस्टार्च मिक्स करा. दोन्ही गोष्टी समान प्रमाणात घेता येतात. हे देखील मिक्सरमध्ये बारीक करा आणि नंतर ते प्लेटवर पसरवा आणि चांगले कोरडे होऊ द्या. तयार केलेले मिश्रण सुकल्यावर त्याचे तुकडे करा आणि पुन्हा मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक पावडर बनवा आणि नंतर बारीक चाळणीतून रंग चाळून घ्या. अशा प्रकारे गुलाबी रंग तयार होईल.

**झेंडूपासून पिवळा रंग :** गुलाबाप्रमाणेच तुम्ही झेंडूच्या पाकळ्यांपासून पिवळा रंग तयार करू शकता, यासाठी तुम्हाला झेंडूची पाने खूप काळजीपूर्वक निवडावी लागतील. पाकळ्यांचा फक्त वरचा भाग घ्या. ते बारीक करा आणि नंतर त्यात कॉर्न स्टार्च घाला आणि पुन्हा तीच प्रक्रिया करा. अशा प्रकारे तुमचा पिवळा रंग तयार होईल.

**जांभळा आणि निळा रंग :** जांभळा रंग तयार करायचा असेल तर लैव्हेंडरचे फुल, जांभळ्या ट्यूलिप सारखी फुले वापरता येतील. निळा रंग बनवायचा असेल तर तुम्ही अपराजिताच्या निळ्या फुलापासून रंग बनवू शकता. गुलाबी रंग बनवताना जी प्रक्रिया केली आहे तशीच करावी.

गुलाल देखील बनवू शकता

हलका हिरवा रंग बनवायचा असेल तर बेसन आणि पालक यांचे मिश्रण चांगले आहे. अशाप्रकारे, या सोप्या पद्धतीने घरी सेंद्रिय रंग बनवून रंगपंचमी अधिक आनंददायी खेळता येईल.

■ ■ ■

### वाचक लिहितात

**संवाद हरवलेली कुटुंब!**

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत संवाद हरवलेल्या कुटुंबांची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. कुटुंबातील सदस्य एकाच घरात राहतात, पण एकमेकांशी संवाद साधायला वेळ नसतो. याला कारणीभूत आहेत तंत्रज्ञानाचे अतीव्यसन, सततची धावपळ, स्पर्धात्मक ताणतणाव आणि कामाचा प्रचंड ताण.

अमेरिकेतील लिसनर नावाची शॉर्टफिल्म हीच वस्तुस्थिती दर्शवते. आजच्या युगात सोशल मीडियावर लाखो मित्र असणारी माणसं प्रत्यक्ष आयुष्यात मात्र एकाकी आहेत. इतकेच नव्हे, तर अशा लोकांसाठी पैसे मोजून संवाद साधण्याची टॉक-टाइम हॉटेल्स सुरू झाली आहेत! हे वास्तव भयावह आहे.

आजकाल आई-वडील मुलांशी संवाद साधण्याऐवजी त्यांना महागड्या गॅझेट्स देऊन खुश ठेवण्याचा प्रयत्न करतात. यामुळेच अनेक मुले नैराश्याला बळी पडतात. नुकताच आत्महत्या केलेल्या नववीतील विद्यार्थ्याची चिठ्ठी हे कटू वास्तव अधोरेखित करते. मी गेल्या अनेक दिवसांपासून तुम्हाला काही सांगायचा प्रयत्न करतोय, पण तुम्ही ऐकून घेत नाही! या वाक्यातील वेदना समजून घेतली पाहिजे. कोरोना महामारीनंतर आत्महत्या आणि मानसिक आजारांचे प्रमाण वाढले आहे. कारण, प्रत्येकाला काही तरी सांगायचंय, पण ऐकणारं कुणीच नाही! संवादाचा अभाव हा मानसिक आरोग्यासाठी घातक ठरतो. म्हणूनच वेळेवर आपल्या प्रियजनांशी संवाद साधणे अत्यंत गरजेचे आहे.

संवाद हीच मानसिक आरोग्याची गुरुकिल्ली आहे! घरात आणि समाजात उघडपणे विचार मांडण्याची सवय लावली पाहिजे. एकमेकांचे मनःस्थिती जाणून घेण्यासाठी वेळ दिला पाहिजे. नाहीतर भविष्यात पैसे मोजून संवाद साधण्याची वेळ आपल्यावरही येऊ शकते! बोला, व्यक्त व्हा, संवाद साधा!

हे नाते टिकवण्याचा आणि आरोग्य जपण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

■ हृषीकेश हरदास, वर्धा.

## बेली फॅट कमी करायचे? वापरून पहा हे ४ डिटॉक्स वॉटर

बदलती जीवनशैली, बाहेरील पदार्थांचे अधिक सेवन करणे, यामुळे अनेकांचे वजन वेगाने वाढत चालेले आहे. जर तुम्हीही वाढणाऱ्या वजनाने खूप चिंतेत असाल आणि अनावश्यक ताणतणावात असाल तर काळजी करण्याची गरज नाही. कारण तुम्ही जर तुमच्या डाएट मध्ये अजून डिटॉक्स वॉटरचा समावेश केला नसेल तर एकदा डिटॉक्स वॉटर पिऊन पहा. आजकाल वाढते वजन ही एक सामान्य समस्या बनली आहे, जी केवळ शरीराच्या फिटनेसवरच नाही तर आरोग्यावरही परिणाम करते. यामुळे वजन वाढल्याने अनेक आजारांचा धोका देखील वाढतो, म्हणून त्यावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे.

डिटॉक्स वॉटरचे सेवन केल्याने तुमच्या शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यासाठी मदत करते. त्याचबरोबर चयापचय वाढवण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी हे अत्यंत फायदेशीर आहे. यातील खास गोष्ट म्हणजे हे डिटॉक्स वॉटर तुम्ही घरी सहज बनवू शकता.

**संत्र आणि दालचिनी डिटॉक्स वॉटर**

संत्री आणि दालचिनी दोन्ही वजन कमी करण्यास मदत करतात. संत्र्यांमध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि इतर पोषक घटक शरीराला हायड्रेट ठेवतात. यामध्ये असलेली दालचिनी ही रक्तातील साखर नियंत्रित करते आणि बेली फॅट कमी करते. यासाठी तुम्ही जर याचे पाणी तयार करून दैनंदिन दिनचर्येत समाविष्ट केले तर बेली फॅट हळूहळू कमी होऊ लागते.

संत्र आणि दालचिनीचे डिटॉक्स वॉटर बनवण्यासाठी पाण्यात काही संत्र्याचे तुकडे घेऊन त्यात काही दालचिनीचे



तुकडे मिक्स करा आणि २ तास फ्रीजमध्ये ठेवा. यानंतर हे पाणी बाहेर काढून थोडे थंड झाल्यावर प्या. या डिटॉक्स वॉटरचे सेवन दररोज करा. काही आठवडयांमध्येच तुमचे वजन कमी होईल.

**लेमन डिटॉक्स वॉटर**

लिंबू केवळ वजन कमी करण्यासाठीच फायदेशीर नाही तर आपल्या त्वचेसाठी देखील खूप फायदेशीर आहे. लिंबू डिटॉक्स वॉटर बनवताना, जर तुम्ही त्यात थोडासा पुदिना घातला तर तुम्हाला त्याचे दुहेरी फायदे मिळतील. तसेच पचनाशी संबंधित समस्यांपासून आराम मिळतो.

लेमन डिटॉक्स वॉटर बनवण्यासाठी पाण्यात लिंबाच्या फोडी मिक्स करा आणि २ तास फ्रीजमध्ये ठेवा. यानंतर हे पाणी बाहेर काढून थोडे थंड झाल्यावर प्या. यामुळे वजन वेगाने कमी होते.

**बार्लीचे डिटॉक्स वॉटर**

बार्ली हे एक धान्य आहे. ज्यामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्व असतात त्याचबरोबर फायबरसह इतर अनेक घटक आढळतात. हे पचनसंस्था मजबूत करतात. यामुळे बद्धकोष्ठता आणि इतर पचन समस्यांचा धोका देखील कमी होतो. बार्लीचे डिटॉक्स वॉटरचे सेवन केल्याने बेली फॅट वितळवण्यासही ते उपयुक्त ठरते. एवढेच नाही तर बार्लीचे पाणी नियमितपणे प्यायल्याने चयापचय वाढतो आणि वजन कमी होण्यास मदत होते.

बार्लीचे डिटॉक्स वॉटर बनवण्यासाठी थोडे बार्ली घ्या. एका मोठ्या भांडयात अंदाजे पाणी घेऊन 7-8 मिनिटे पाणी उकळवा. पाणी अर्धे झाल्यावर ते एका कपात गाळून त्यात लिबांचा रस टाकुन थंड करा. आता हे बार्लीचे डिटॉक्स वॉटर हळूहळू चहासारखे प्या.

**काकडी-पुदिन्याचे डिटॉक्स वॉटर**

बाजारात काकडी व पुदिना देखील सहज उपलब्ध होईल. तर या दिवसात शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी काकडी-पुदिन्याचे डिटॉक्स वॉटर तयार करून नियमित यांचे सेवन करा. हे बनवण्यासाठी, काकडी-पुदिना स्वच्छ धुवा आणि चांगले चिरून घ्या. चिरलेले काकडी आणि पुदिना पाण्यात मिसळा. तयार झालेले हे पाणी सुमारे दोन तासांनी प्या. यामुळे चयापचय वाढतो आणि वजन कमी होण्यास सुरुवात होते. हे डिटॉक्स वॉटर शरीराला ताजेतवाने देखील ठेवते, यामुळे पचनक्रियाही चांगली राहते .

■ ■ ■

### अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

**बुरा ना मानो..!**

कुणी काढले होते का मोर्चे
केली होती का मागणी
तिजोरीत खणखणाट असुनही
का देत आहात
लाडक्या बहिणीला
ओवाळणी?

द्यायचच आहे तुला तर
आमच्या हाताले काम दे
तुज्या भाच्यायले सरव्हीस दे
स्वाभीमानानं जगण्याचा
आनंद आम्हाले मिळू दे..!

तुज्या सुशिक्षीत भाच्याचं
वय झालय भावा तीस
चपला घासल्या रे,पण
लागली नाय कुठं सरव्हीस..!



# क्रीडा संकुलाच्या विविध विषयांवर जिल्हाधिकारी कार्यालयात चर्चा

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथील १४९ गाळे थकित भाडेवसुली व आवश्यक कारवाई आणि हस्तांतरण, तसेच क्रीडा प्रबोधिनीच्या जागेचा परिसर अतिक्रमण मुक्त करण्यासाठी कार्यवाहीचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा परिषदेच्या बैठकीत संकुलाबाबत चर्चा करण्यात आली.



त्यावेळी ते बोलत होते. महापालिका उपायुक्त गीता ठाकरे, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, क्रीडा अधिकारी मनीषा ठाकरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी रतन सिंग पवार, पोलीस उपनिरीक्षक गोविंद साबळे आदी उपस्थित होते. जिल्हा क्रीडा संकुल समिती अंतर्गत असलेले एफडीचे रोखीकरण, गाळे थकित भाडेवसुली, आवश्यकतेनुसार कारवाई व हस्तांतरणाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांतर्गत क्रीडा प्रबोधिनीच्या म्हैसपूर येथील जागेवरचे अतिक्रमण काढण्याबाबत निर्देश देण्यात आले.

# भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव अंतर्गत मनपात सामुहिकरित्या उद्देशिकाचे वाचन

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षा निमित्त राज्य शासनाच्या निर्देशानुसार, भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता, तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबदल सर्व नागरिकांमध्ये तसेच उपेक्षित समुदायांमध्ये घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबदल जागरुकता वाढविण्यासाठी संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ 'घर घर संविधान' कार्यक्रम साजरा करण्यासाठी विविध स्पर्धा/उपक्रमे आयोजित करण्याचे क्रमप्राप्त असून यामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामुहिकरित्या वाचन, शाळा/महाविद्यालये/वसतिगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन करवून घेणे, शालेय वाचनालयात भारतीय संविधानाच्या किमान ५ प्रति विद्यर्थ्यांना वाचनासाठी करवून देणे, भारतीय संविधानाबाबत सर्व साधारण माहिती देणे, जसे निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर व्याख्यान (किमान ६० ते ९० मिनिटे), विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे हक्क, आणि कर्तव्ये यावर मार्गदर्शन करणे, कार्यशाळांव्दारे संविधानाचे तत्वज्ञान आणि मुल्ये समजावून सांगणे, संविधान मुल्ये यावर पथनाट्य तयार करणे, शाळा/महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर्स आणि प्रदर्शन आयोजित करणे, संविधान दिन कार्यक्रम अयोजित करणे, ज्यात पथनाट्य आणि पोस्टर प्रदर्शन याचा समावेशन करावा, संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा ईत्यादी उपक्रमांचे आयोजन करणे, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण (जसे देशभक्तिपर गाणी, नाटक आणि नृत्य) आदिंचा समावेश आहे.

या अनुषंगाने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये आज दि. १२ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वा. मनपा मुख्य कार्यालय येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे तसेच अकोला मनपाच्या पुर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोन कार्यालये, मनपा वैद्यकीय आरोग्य विभाग, मनपा शिक्षण विभाग, मनपा अग्निशमन विभाग येथे अधिकारी, कर्मचा-यांव्दारे सामुहिकरित्या भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन करण्यात आले आहे.

यावेळी मनपा उपायुक्त धनश्री पवार, मुख्य लेखा परिक्षक, व्हि.आर.शेळके, सहा.आयुक्त विजय पारतवार, विठ्ठल देवकते, दिलीप जाधव, देविदास निकाळजे, मनपा विभाग प्रमुख यांचेसह अधिकारी आणि कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# संगमेश्वरला संभाजी महाराजांचे स्मारक छावा संघटनेतर्फे शासनाचे आभार

## छावा संघटनेतर्फे छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली



▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. या घोषणेचे 'छावा'संघटनेतर्फे स्वागत करण्यात आले असून महाराष्ट्र शासनाचे आभार मानण्यात आले आहेत. संभाजी महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात संभाजी महाराजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी सर्वानुमते शासनाचे आभार मानण्यात येऊन घोषणा केल्यानुसार छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक तातडीने पूर्ण करावे व खऱ्या अर्थाने महाराजांचा मानसन्मान करावा अशी मागणी याप्रसंगी करण्यात आली.१ फेबुवारी १६८९ रोजी संभाजी महाराजांना अटक करण्यात आली. ९ फेब्रुवारी १६८९ रोजी राजाराम महाराजांचे मंचकारोहन करण्यात आले. १ फेबुवारी ते ११ मार्च १६८९ हा संभाजी महाराजांच्या जीवनातील चीर वेदनेचा प्रवास होता. शंभुराजांना अटक झाली त्या दिवसापासून त्यांना अनंत यातना देऊन ११ मार्च १६८९ रोजी त्यांचा शिरच्छेद करण्यात आला.त्यापूर्वी १७ फेबुवारी रोजी महाराजांचे डोळे काढण्यात आले. व दुसऱ्याच दिवशी त्यांच्या सोबत असलेल्या कवी कलशांची जीभ उपटण्यात आली. एकाकी पडलेल्या, व अनपेक्षित संकटात सापडलेल्या असहाय शंभूराजांनी त्या विकराल स्थितीवरही मात करत मृत्यूलाही जिंकले व ते ' मृत्युंजय ' झाले. त्यांच्यासोबतच ११ मार्च रोजी कवी कलशांची ही हत्या करण्यात आली. शंभूराजांचे स्मारक तयार होत असलेले संगमेश्वर हे गाव रत्नागिरी जिल्ह्यातील ऐतिहासिक गाव आहे. या तालुक्याचे मुख्यालय संगमेश्वर गावापासून १७ कि. मी. अंतरावर असलेल्या देवरुख येथे आहे. या गावातच संगमेश्वर तालुक्याचे पंचायत समिती कार्यालय आहे.

# होळीका दहनाचा कार्यक्रम खुल्या मैदानामध्ये करावे

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): अकोला महानगरपालिका क्षेत्रात होळीकोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. होळीका दहन कार्यक्रम साजरा करतांना आयोजकांनी काँक्रीट व डांबरी रस्त्यांना नुकसान होणार नाही, नागरिकांना वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही तसेच नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची आवश्यक काळजी घेऊन आयोजकांनी होळीका दहन कार्यक्रम खुल्या जागेमध्ये करण्याचे आवाहन अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

# २३ वर्षीय तरुणीची आत्महत्या-पोलीस तपास सुरू

▪पातुर,दि १२ (प्रतिनिधी): पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या देऊळगाव येथील एका आयटीआय समोरील पळसाच्या झाडाला गळफास घेऊन २३ वर्षीय तरुणीने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आत्महत्या करणाऱ्या तरुणीचे नाव राधा रतन सोळंके असे असून, ती मूळची देऊळगावची रहिवासी आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राधा सोळंके ही अकोला येथे नर्सिंगचे शिक्षण घेत होती. घटनास्थळी तिच्यासोबत शालेय दप्तर आढळून आले आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पातूर पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.घटनेची माहिती मिळताच पातूर पोलिसांनी त्वरित पंचनामा केला. अधिक तपासासाठी मृतदेह अकोला येथील सवीच्च रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

राधाने टोकाचे पाऊल का उचलले याचा शोध पोलीस घेत असून, तिच्या कुटुंबीयांकडून तसेच मित्रमंडळींकडून चौकशी केली जात आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. राधा ही शिकून मोठे होण्याचे स्वप्न पाहणारी तरुणी होती. तिच्या आत्महत्येचे नेमके कारण काय, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.पुढील तपास पातूर पोलीस करत आहेत.

# कबड्डी मुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते : विनायक माळी

▪तेल्हारा,दि १२ (प्रतिनिधी): तेल्हारा तालुक्यातील हिंगणी बृ येथे अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या कबड्डी स्पर्धा उद्घाटनाच्या कार्यक्रम अध्यक्ष स्थानी आतंरराष्ट्रीय खेळाडू विनायक माळी हे होते



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून. उ बा ठा चे मंगेश काळे विठ्ठल महाराज कोरडे अजय गावंडे विकास पवार बाळासाहेब निमकर्डे तोताराम कापकर होते तर बक्षीस समारंभाला अस्थिरोग तज्ज्ञ डॉ नरेंद्र सरोदे डॉ भेंडे डॉ तेजराव नराजे श्रीकृष्ण वैतकार सदानंद खारोडे गुरूपाटील अशोक नराजे सुनील नराजे केलास कोरडे गोपाल वाघ प्रविण कोरडे सत्यजित जवजांळ होते स्व आशाताई पोहरे याच्या स्मृती प्रित्यर्थ जगदंबा क्रीडा मंडळाच्या वतीने कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचा प्रथम बक्षीस संत गाडगेबाबा क्रीडा मंडळ अमरावती तर दृतिय बक्षीस साई स्पोर्ट् विदर्भ मडंळ अमरावती तर तृतीय सामुहिक म्हणून जय हनुमान क्रीडा मंडळ बेलखेड व चपांमाता क्रीडा मंडळ माळेगाव यांनी पटकाविले या कबड्डी स्पर्धा साठि विस संघ सहभागी झाले होते.

मॅन ऑफ द सिरिज आदेश वरखेडे अमरावती यांनी पटकाविले तर बेस्ट रेडर म्हणून रोशन आमले अमरावती यांनी पटकाविले कबड्डी स्पर्धा साठि सर्व बक्षीस आदित्य पोहरे यांनी दिले होते. कबड्डी स्पर्धा काहि अनुचित प्रकार घडू नये यासाठी हिंगणी येथील नंदकिशोर सोळंके चेतन नराजे सागर नराजे दिलिप पवार गजानन वाघ गोपाल खडसे शुभम वाघ तुकाराम नराजे यांनी सहकार्य केले कार्यक्रम प्रास्ताविक प्रतिक पखान तर आभार प्रदर्शन गोपाल वाघ यांनी केले.

# छत्रपती संभाजी राजे बलिदान दिवस डाबकी रोड येथे संपन्न



▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): ११ मार्च १६८९ रोजी पन्हाळगडावरून औरंगजेबाने त्यांची निघृण हत्या केली, परंतु त्यांच्या बलिदानाने हिंदवी स्वराज्याचा विजय अधिक सशक्त केला. त्याग, निष्ठा आणि पराक्रम यांचा अमर संदेश देणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिवस डाबकी रोड येथे साजरा करण्यात आला.यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांचा ११ मार्च हा बलिदान दिवस म्हणून साजरा केला जातो कारण हाच दिवस आहे ज्या दिवशी छत्रपती संभाजी राजे भोसले यांनी पंधरवड्याहून अधिक काळ मुघल राजा औरंगजेबाने दिलेल्या भयंकर यातना सहन करून स्वराज्य स्थापनेसाठी प्राणाची आहुती दिली अशी माहिती आपला माणूस डॉ अशोक ओळंबे यांनी दिली.

# थकित करापोटी पुर्व आणि उत्तर झोन येथील तीन मालमत्तांवर सीलची कारवाई

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि कर अधिक्षक विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन अंतर्गत टिळक रोड, मोठा गणपती जवळ, आकार डेव्हलपर्स वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. ८६० धा.उमेश मुंडे, आदिवासी मुलांचे वसतीगृह यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये १२,७८,५४१/- मालमत्ता कर थकित असल्याने तसेच जापान जीन येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. ३०२ धा.रामस्वरूप भुरामल व रामपाल सारडा यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ७६,९६०/- मालमत्ता कर थकित असल्याने तसेच पुर्व झोन अंतर्गत महसूल कॉलोनी येथील वार्ड क्रं. अे-१ मालमत्ता क्रं. ४१४ धा. मैत्रेय प्लांट्स ॲण्ड स्ट्रक्चरल प्रायव्हेट लि. यांचेकडे २००७-०८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ३,३७,००८/- मालमत्ता कर थकित असल्याने या तीन्ही प्रतिष्ठानावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.



सदर कारवाई सहा.आयुक्त विजय पारतवार, विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत झाली असून या कारवाईत राजू सरप, सहा.कर अधिक्षक हेमंत शेळवणे, देवेंद्र भोजने, रमाकांत बगरेट, कनिष्ठ अभियंता निवृत्ती दातकर, मोहन घाटोळ, संतोष सुर्यवंशी आदि उपस्थित होते.

# शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न



▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): विद्याथी विकासाच्या संदर्भात नवनवीन उपक्रम साकार करणाऱ्या जुन्या शहरातील शंकरलाल खंडेलवाल आर्ट,सायन्स व कॉमर्स महाविद्यालयात बुधवारी भौतिक शास्त्रातील उदयोन्मुख ट्रेंड या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद मोठ्या उत्साहात संपन्न झाली. महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने व प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान अंतर्गत आयोजित या परिषदची अध्यक्षता शिक्षण प्रसारक मंडळच्या अध्यक्ष ताराताई हातवळणे यांनी केली.परिषदेचे उद्घाटन डॉ.यी.सेंग तान, सनवे विद्यापीठ, क्वाललामपूर, मलेशिया यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ.एम.डी. शिरसाट,अधिष्ठाता बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे होते.यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ पी.एस.पांडे, समन्वयक डॉ. संजय देव्हडे, डॉ हरिदास खरात आदी मान्यवर उपस्थित होते.

# अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी): सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. त्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ 'महाराष्ट्र.जीओव्ही.इन' या संकेतस्थळावर ताज्या घडामोडींमध्ये या उपक्रमाची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावा. ऑनलाईन अर्जाची प्रत पोस्टाने किंवा समक्ष समाजकल्याण आयुक्तालय, ३, चर्च रोड, पुणे ४११००१ येथे सादर करावा. अर्ज दि. ३० एप्रिलपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थी अनुसूचित जाती, नवबौद्ध समाजातील व महाराष्ट्राचा रहिवासी असावा. परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांत पूर्णवेळ प्रवेशित असावा. विहित कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे कमाल वयोमर्यादा आहे.

# कर्जमाफी देण्याचा मुख्यमंत्र्यांनी पुनर्विचार करावा : अन्यथा अन्नत्याग आंदोलन



▪मुर्तिजापुर,दि १२ (प्रतिनिधी): मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी जाहीर सभेत शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, 'सत्तेवर आलो तर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू' मात्र, सादर झालेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी कोणतीही तरतूद नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. या निर्णयामुळे शेतकरी हवालदिल झाले असून, कर्जबाजारीपणात अधिक अडकण्याची भीती निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून त्यांना नवीन वर्षात पीक कर्ज मिळावे, यासाठी शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजूभाऊ वानखडे यांनी मुख्यमंर्त्यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, सरकारने दिलेले आश्वासन पाळले नाही तर येत्या १९ मार्च २०२५ रोजी मूर्तीजापूर तालुक्यातील १५० गावांतील शेतकरी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसतील.यापूर्वी २१ फेबुवारी २०२५ रोजी या मागणीसाठी आठवण मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, सरकारने कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. त्यामुळे सरकारला जाग आणण्यासाठी शेतकरी मंडळाने आता अधिक तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.या मागण्यांसाठी प्रगती शेतकरी मंडळ, स्वाभिमानी शेतकरी संघटना मुर्तीजापूर, जनमंच नागपूर, आंतरभारती पुणे, न्यू यंग क्लब फार्मर्स गुप, यंग बॉईज क्लब मूर्तीजापूर यांच्या वतीने एस.डी.ओ.मार्फत मुख्यमंर्त्यांना निवेदन देण्यात आले.


## कार्यालय नगर परिषद, अकोट, जि. अकोला

जा.क्र.नपअ/बांधकाम/२०२४-२५

**कोरी-निविदा (पहिली वेळ)**

अकोट नगरपरिषद, अकोट जि. अकोला चे विकास शुल्क निधी अंतर्गत मुख्याधिकारी, नगरपरिषद, अकोट बांधकाम विभागाकडे खालील कामांकरिता योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदारांकडून खालील कामांची कोरी-निविदा पध्दतीने दर मागवीत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | निविदा फार्म प्रपत्राची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकोट शहरातील रामटेकपुरा येथील हनुमान मंदिरचे उर्वरीत बांधकाम करणे, | ४८७०७३/- | ५०००/- | ५००/- | ०१ महिना |

कोरी निविदा व्दिलिफाफा प्रसिध्दीचा तपशिल :-

| | |
|---|---|
| कोरी निविदा प्रपत्र विक्रिची दिनांक व वेळ | दि. १३/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. ते दि. २०/०३/२०२५ सायं. ५.०० वा. कोरी निविदा व अनामत भरणा करता येईल. |
| लिफाफाबंद निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि. २१/०३/२०२५ संध्याकाळी ५.०० वा पर्यंत |
| निविदा उघडण्याची दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दि. २४/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. |

अटी व शर्ती :-
१. अनामत रक्कम नगदीने किंवा डी.डी. स्वरुपात मुख्याधिकारी न.प. अकोट यांचे नावे भरावे लागेल.
२. निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात देईल.
३. पुरवठा धारकांचे देयकातुन नियमानुसार शासकीय कर व इतर शासकीय वजाती कपात करण्यात येईल.
४. ESIC प्रमाणपत्र व चालाणाची प्रती सोबत जोडणे बंधनकारक राहिल.
५. EPF प्रमाणपत्र व चालाणाची प्रती सोबत जोडणे बंधनकारक राहिल
६. इतर अटी व शर्ती तसेच साहित्य यादीचे विवरण कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संबंधीत विभागात पहावयास मिळतील.
७ कोणतेही एक किवा सर्व निविदा कारण न दर्शविता निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

(डॉ. नरेंद्र बेंबरे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद, अकोट


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आघाडीचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या आणि शेतमालाला हमीभाव मिळावा, या मागण्यांसाठी महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोरदार आंदोलन केले. महायुती सरकारच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी ठोस निर्णय न घेतल्याच्या निषेधार्थ आघाडीच्या आमदारांनी घोषणाबाजी करत सरकारचा तीव्र निषेध नोंदवला.

आंदोलनादरम्यान कंत्राटदार तुपाशी, शेतकरी उपाशी...!, निवडणूक सरली, कर्जमाफी विसरली...! अशा घोषणांनी संपूर्ण विधिमंडळ परिसर दणाणून गेला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारवर टीका करताना नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक संकटाने ग्रस्त शेतकऱ्यांना मदतीऐवजी सरकारने दुर्लक्षित केले, असा आरोप केला.




महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारला जाब विचारत, निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे आश्वासन देणाऱ्या सरकारने आता पाठ फिरवली आहे, असा आरोप केला. राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ आणि आर्थिक संकटामुळे शेतकरी अडचणीत आहे. मात्र, नव्या अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी कोणतीही भरीव घोषणा नाही.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारच्या धोरणांवर टीका करताना, महागड्या विकास प्रकल्पांसाठी भरमसाट निधी आहे, मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी काहीच नाही, असे सांगितले. सरकारने त्वरित शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर करावी, अन्यथा लढा तीव्र करू, असा इशारा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला.

आमदारांनी सरकारला इशारा देत शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढा थांबणार नाही असे स्पष्ट केले. सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिला.

या आंदोलनावर सरकारकडून २कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार काय भूमिका घेते आणि महाविकास आघाडी यापुढे काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# बहुचर्चित शिफा प्रकरणाची एसआयटी चौकशी करा

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १२ :

## फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



देसाईगंज शहराच्या राजेंद्र वार्डात ब्युटी पार्लरच्या आड अल्प किंमतीत महागड्या वस्तू देण्याचे आमिष दाखवुन अनेकांना कोट्यवधी रुपयाने गंडविणाऱ्या शिफा प्रकरणाची एसआयटीमार्फ त चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी अनेक गुंतवणूकदारांनी केली आहे.

शिफा उर्फ शबाना राज मोहम्मद चौधरी व प्रकरणातील मोस्ट वांटेड आरोपी राज मोहम्मद शेख उर्फ चौधरी यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर देसाईगंज पोलिसांनी शिफाच्या राहत्या घरी धाड टाकली होती. त्यावेळी सापडलेल्या चिठ्ठीत या प्रकरणाशी संबंधित सहा संशयित आरोपींची नावे आढळून आले होती.

या प्रकरणात फसवणूक झालेल्या 15 जणांच्या बयाणावरून 1 कोटी 92 लाख 5 हजार रुपयाने फसवणूक झाल्याचे उघडकिस आले होते. दरम्यान तक्रारीचा आकडा वाढत गेल्याने या प्रकरणात किमान 3 ते 4 कोटीने फसवणूक झाल्याचा अंदाज आहे

फसवणूक प्रकरणी पोलिसांनी सहा पथक करून देसाईगंज येथील आकाश अग्रवाल, अजय अग्रवाल, अरूण साळवे, ईब्राहीम खान, भोला पटेल, आरमोरी येथील बबलु जीवाणी या सहा जणांच्या घरी धाडी टाकून चौकशी केली होती. संशयितांना चौकशीसाठी पोलिसांसमोर हजर राहण्या संदर्भात दोनदा नोटीस बजावण्यात आली होती. परंतु, लॉकडाऊनच्या काळात चेकपोस्ट भेदुन आरोपी फरार झाले होते.

शहराच्या शांतीनगरातील एका महिलेचीही कसुन चौकशी करण्यात आली असता तिच्याकडुनही अनेक आक्षेपार्ह दस्तावेज पोलिसांच्या हाती लागले होते. एका महिलेच्या बँक खात्यातुन लाखोंची हेराफेरी केली असल्याची माहिती समोर आली.

संशयीत आरोपींना दोनदा नोटीस बजावण्यात आल्यानंतरही पोलिसांसमोर हजर झाले नाहीत. तब्बल दिड महिना फरार राहुन नंतर शहरात दाखल झाले. मात्र त्यांना ताब्यात घेतले गेले नाही. संशयित आरोपी इब्राहिम पठाण याने शिफाला धमकी दिल्याने पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली होती. मात्र, त्याही अनुषंगाने कारवाई करण्यात आली नाही. या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून न्याय मिळवून देण्यात यावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## कॅन्सर रुग्णालयाचे काम कासवगतीने
# लिनिअर एक्सिलेटरचा खर्च दुप्पट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) प्रस्तावित कॅन्सर रुग्णालयाचे काम सुरू आहे. परंतु ते केव्हा पूर्ण होऊन सुरू होणार? याबाबत अद्यापही कुणी सांगू शकत नाही.

त्यातच मेडिकल रुग्णालयात अद्याप लिनिअर एक्सिलेटर यंत्र पोहचले नाही. या यंत्राची खरेदी वर्षानुवर्षे लांबल्याने या यंत्राचा खर्च दुप्पट झाला असून त्याला जबाबदार कोण, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

मुखाचे कर्करुग्ण सर्वाधिक आढळणाऱ्या भागात नागपूरचे नाव वरच्या क्रमांकावर आहे. त्याला तंबाखू, गुटखा, पान मसाल्याचे सेवन हे महत्त्वाचे कारण आहे. येथे स्तनाचा कर्करोग व इतरही कर्करुग्ण मोठ्या संख्येने आढळतात. नागपुरात बहुप्रतिक्षित कॅन्सर इन्स्टिट्यूट १८ महिन्यात उभारण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश होते. सन २०१९ मध्ये मुदत संपल्यावरही ते झाले नाही. त्यानंतर न्यायालयाच्या दबावात आता या इन्स्टिट्यूटचे काम सुरू आहे.

दरम्यान, शासनाने मेडिकलच्या कर्करोग विभागाला ह्यलिनिअर एक्सिलेटरह्वसाठी २३.२० कोटी रुपयांचा निधी दिला होता. हा निधी यंत्र खरेदीसाठी मेडिकलकडून हाफकीन संस्थेकडे वर्गही झाला होता. परंतु, हाफकीनला यंत्र खरेदी करता आली नसल्याने हा निधी सरकारला परत केला गेला.

त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेल्याने तातडीने हा निधी परत मिळाला. फेब्रुवारी २०२४ दरम्यान पुन्हा निविदा प्रक्रिया झाली. यावेळी मेडिकलकडून वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संबंधित समितीकडे यंत्रात आवश्यक सोयीबाबतचे सादरीकरणही झाले. त्यानंतर दोन कंपन्यांनी यंत्र देण्याबाबत रस दाखवला. परंतु, त्यानंतर तांत्रिक कारणाने अद्यापही पुढील प्रक्रिया झाली नाही.

या यंत्राची देणी डॉलरमध्ये देण्यावरून कंपनी अडून बसली होती. त्यामुळे हे यंत्र रखडले आहे. आता यंत्र येण्याचे संकेत आहे. परंतु, नवीन यंत्र, त्याची सुमारे १० वर्षे देखभाल व दुरुस्तीसह इतर खर्च पकडून आता या यंत्राची किंमत सुमारे ४५ कोटी रुपयांवर पोहचली आहे. त्यामुळे यंत्र खरेदीत दिरंगाईमुळे यंत्राची किंमत सुमारे दुप्पट झाली आहे.

आजच्या स्थितीत जगभरात कर्करुग्णांवर आधुनिक लिनिअर एक्सिलेटरवर उपचार होत असले तरी नागपुरातील मेडिकलमध्ये हे यंत्र नसल्याने येथील रुग्णांना कालबाह्य कोबाल्ट यंत्रावर उपचार दिले जात असल्याचे पुढे आले आहे.

# धाकट्या भावाने केला मोठ्याचा खून

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

## कळमन्यातील गुलशन नगरात थरार

जेवन झाल्यानंतर आई शेजारी राहणाऱ्या नातनीसोबत गप्पा मारत होती. जेवन करून घे, या शब्दावरून सुडाने पेटून उठलेल्या धाकट्याने थोरल्या भावाची हत्या केली. विळ्याने सपासप वार करून त्याला रक्ताच्या थारोळ्यात लोळविले. हा थरार आईच्या डोळ्यासमोरच घडला.

आईने आरडा ओरड केली. मात्र, त्याचा काहीच उपयोग झाला नाही. अखेर पोटच्या तरुण मुलाच्या आईच्या डोळ्यासमोरच श्वास थांबला. ही थरार घटना कळमना पोलिस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी रात्री घडली. राजु कुंभलाल यादव (३०) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आईच्या तक्रारीवरून मुलगा विजय यादव (२३) याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

गुलशननगर येथील रहिवासी रमा यादव (६०) यांना तीन मुले आणि एक मुलगी आहे. मुलगी शेजारीच राहते. मृतक राजू हा मजुरी करायचा तर राजेश कळमना बाजारात मिरची व्यापाऱ्याकडे काम करतो. विजय हा निव्वळ वस्तीत फिरून टवाळक्या करतो. मंगळवार ११ मार्चच्या रात्री सर्वजण घरी होते. फिर्यादी जेवन करून तिच्या नातनीसोबत गप्पा मारत होती. राजू हा सुध्दा जेवन करून बसला होता. त्याच वेळी विजय घरी आला. राजुने त्याला जेवन करून घे, असे म्हटले. यावरून त्याने राजुला शिवीगाळ केली.

अचानक तो सुडाने पेटला. मोठ मोठ्याने ओरडून तो शिवीगाळ करीत होता. यावरूनच दोन भावात वाद पेटला. वाद विकोपाला जाताच विजयने स्वयंपाक घरातून विळा आणला आणि राजूच्या छाती आणि डोक्यावर सपासप वार करून त्याला रक्तबंबाळ केले. आईने आरडा ओरड केली तर नातीनही रडत घरी गेली. वडिलांना बोलावून आणले.

जखमी अवस्थेत राजूला मेयो रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. माहिती मिळताच कळमना पोलिसांचे पथक मेयो रूग्णालयात पोहोचले. तक्रारीवरून आरोपी विरूध्द गुन्हा दाखल केला. काही वेळातच आरोपी विजयला अटक केली. त्याला न्यायालयात उपस्थित करण्यात आले. शवविच्छेदनानंतर पार्थिव कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले.

## एसटी कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळणार का?

■ मुंबई, दि. १२ :

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांना वेळेत आणि ठरलेल्या तारखेला पगार मिळावा यासाठी राज्य सरकार कृती आराखडा तयार करणार का? आणि एसटी कर्मचाऱ्यांना न्याय देणार का? असा थेट सवाल भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी विधान परिषदेत उपस्थित केला.

याचवेळी विधानपरिषदेचे सदस्य परिणय फुके यांनी एसटी महामंडळाकडून कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळामध्ये जमा न केल्याबाबत प्रश्न उपस्थित केला. आ. प्रविण दरेकर म्हणाले, एसटी कर्मचाऱ्यांना वेळेत पगार मिळत नाही. सातत्याने पगार रखडतो. एसटी कर्मचाऱ्यांचा पगार ठरलेल्या तारखेला वेळेत मिळेल, यासाठी शासनाने कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी दरेकर यांनी केली. एसटी कर्मचाऱ्यांना ठरलेल्या तारखेला वेतन मिळावे, यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल, असे आश्वासन परिवहन मंत्री सरनाईक यांनी सभागृहात दिले.











